सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ०८ फेब्रुवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३०२ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात...

### परीक्षेसाठी प्रशासन सज्ज

**पुणे:** पुढील काही दिवसांमध्ये राज्यात सर्वत्र परीक्षांचे वारे वाहू लागणार आहेत. बारावीच्या परीक्षा १० फेब्रुवारी ते ११ मार्च, तर दहावीच्या परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होणार आहेत. या परीक्षेत गैरप्रकार होऊ नये यासाठी पुणे प्रशासन क्शन मोडवर आलं आहे. त्यांनी यावर्षी परीक्षेसाठी नवीन नियमावली केली असून ते नियम पाळले नाही तर कडक कारवाई करण्यात येणार आहे. नवीन नियमांनुसार परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटर अंतरात अनधिकृत व्यक्तींना प्रवेश बंद करण्यात आला आहे. तसेच एका विद्यार्थी सोबत दोन किंवा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली आहे.

### सॅमसंगचा नवा मोबाईल

**मुंबई :** सॅमसंग या भारतातील आघाडीच्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज सॅमसंग गॅलेक्सी ए०७ ५जी लॉंच केला. या स्मार्टफोनमध्ये ५० मेगापिक्सल मेन कॅमेरा, ६००० एमएएच बॅटरी आहे. हा स्मार्टफोन ऑनलाइन मनोरंजनासाठी, कन्टेन्ट कॅप्चर करण्यासाठी आणि दिवसभर विना–व्यत्यय वापरासाठी डिझाइन करण्यात आला आहे. हा स्मार्टफोन उद्योग–श्रेणीच्या डेटा सुरक्षिततेकरिता मापदंड देखील स्थापित करतो, ज्यामधून मन:शांती मिळते. सॅमसंगमध्ये आम्हाला अधिक महत्त्वाकांक्षी असलेल्या तरूण ग्राहकांच्या गरजांबाबत माहित आहे. आजचे जनरेशन झेड अधिक सोशल कन्टेन्ट निर्माण करत आहेत, ते अधिकाधिक मोबाइल गेमिंगचा आनंद घेत आहेत, तसेच अधिक प्रमाणात ऑनलाइन कन्टेन्टचा वापर करत आहेत. सॅमसंग गॅलेक्सी ए०७ ५जी 'मोअर ऑसम' असण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे.

### तिरुपती लाडू वाद पुन्हा पेटला

**तिरुपती :** तिरुपती बालाजी मंदिरातील लाडू प्रसादाच्या शुद्धतेवरून सुरू असलेला वाद पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी माजी मुख्यमंत्री वाय. एस. जगन मोहन रेड्डी यांच्या कार्यकाळाबाबत गंभीर आरोप करत, त्या काळात वापरण्यात आलेल्या तुपाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.कुरनूल जिल्ह्यातील येमिगनूर येथे झालेल्या एका जाहीर सभेत बोलताना मुख्यमंत्री नायडू यांनी आरोप केला की, रेड्डी सरकारच्या काळात तिरुपतीचे लाडू बनवण्यासाठी वापरलेले तूप रसायनांपासून तयार करण्यात आले होते. या तुपाच्या निर्मितीत वापरलेले काही घटक हे बाथरूमच्या साफसफाईसाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनांशी संबंधित आहे. त्यामुळे धार्मिक भावना आणि आरोग्याच्या दृष्टीने हा मुद्दा संवेदनशील ठरला आहे.

### ग्लोबल शुगर एआय समिटचे आयोजन

**बारामती :** फाइंडेबिलिटी सायन्सेसने जाहीर केले आहे की ग्लोबल शुगर एआय समिट २०२६ हे ८ फेब्रुवारी २०२६ रोजी बारामती, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात येणार आहे. या समिटचे सहआयोजन ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती, पॅंटालिऑन शुगर होल्डिंग्स आणि यूपीसीएससी (युनिव्हर्सिटी/प्लॅटफॉर्म फॉर कोलॅबोरेटिव्ह शुगरकेन सायन्स) यांच्या संयुक्त विद्यमाने होणार असून, स्टोमाटा लॅब्स आणि ऊर्जा बायो सिस्टीम्स यांचा प्रायोजक म्हणून पाठिंबा लाभणार आहे. हे समिट साखर उद्योगातील उत्पादक, कृषी–तंत्रज्ञान नवोन्मेषक, धोरणकर्ते आणि प्रत्यक्ष कार्यरत व्यावसायिकांना एकत्र आणून साखर मूल्य साखळीमध्ये व्यावहारिक कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) उपायांचे प्रभावी अंगीकरण कसे करता येईल, यावर केंद्रीत असेल.

### उपमुख्यमंत्री शिंदेंचा मदतीचा हात

**पुणे :** शेततळ्यात बुडून मृत्युमुखी पडलेल्या आफान अफसर ईनामदार ( वय १०) आणि रीफत अफसर ईनामदार (वय ७) या चिमुकल्यांच्या कुटुंबियांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाच लाख रुपयांची मदत देऊ केली आहे. नगरपालिका निवडणुकीवेळी जुन्नरमध्ये पचारासाठी आले असता त्यांना या दुर्दैवी घटनेबद्दल कळल्यानंतर त्यांनी ईनामदार कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली होती. त्यानंतर आता त्यांनी त्यांना मदतीचा हात देऊ केला आहे.

### खेळाडूंना आरक्षणाचा लाभ

**मुंबई :** गुणवत्ताधारक शासकीय व निमशासकीय सेवेमधील ५ टक्के आरक्षणाचा लाभ खेळाडूंना पारदर्शक, जलद व त्रुटीमुक्त पद्धतीने मिळावा, यासाठी ब्लॉकचेन व कृत्रिम बुद्धिमत्ता या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने मान्यता दिली असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी दिली.

# पंतप्रधान मोदींच्या मलेशिया दौऱ्यामुळे भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणाला मिळणार बळकटी



**क्वालालंपूर/वृत्तसंस्था :** मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्या निमंत्रणानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मलेशियाचा दोन दिवसांचा अधिकृत दौरा सुरू केला आहे. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून पंतप्रधान मोदींचा हा तिसरा मलेशिया दौरा आहे. विशेष म्हणजे पंतप्रधान मोदींच्या या दौऱ्यामुळे भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणाला कशी गती मिळते याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

या भेटीदरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी मलेशियन समकक्षांसोबत द्विपक्षीय सहकार्याच्या विविध पैलूंवर व्यापक चर्चा करणार आहेत. पंतप्रधान मलेशियातील भारतीय समुदायाच्या सदस्यांशी संवाद साधतील, तसेच व्यापारी नेते आणि उद्योग प्रतिनिधींना भेट देतील. परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, ही भेट १० व्या भारत–मलेशिया सीईओ फोरमच्या निमित्ताने होणार आहे. भारत आणि मलेशियाचे जुने संबंध आहेत जे सामायिक इतिहास, संस्कृती आणि सभ्यतेमध्ये खोलवर रुजलेले आहेत.

भारताचे ॲक्ट ईस्ट धोरणाचे उद्देश आग्नेय आशिया, पूर्व आशिया आणि आशिया–पॅसिफिक प्रदेशातील देशांशी भारताचे संबंध मजबूत करणे हा आहे. हे धोरण मूलतः १९९१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव यांनी स्वीकारलेल्या धोरणाशी संबंधित आहे.

पंतप्रधान मोदींच्या मलेशिया भेटीमुळे या उपक्रमाला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. आग्नेय आणि पूर्व आशियाई देशांसोबत व्यापार, गुंतवणूक आणि तांत्रिक सहकार्य वाढवणे हे पंतप्रधान मोदींनी पदभार स्वीकारल्यापासूनचे प्रमुख ध्येय आहे. सरकारने ॲक्ट ईस्ट पॉलिसी अंतर्गत भारताला आसियान राष्ट्रांशी जोडण्यासाठी वाहतूक, पायाभूत सुविधा आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी (रस्ते, रेल्वे, बंदरे आणि डिजिटल नेटवर्क) विकसित करण्यासाठी सक्रियपणे काम केले आहे.

ऑगस्ट २०२४ मध्ये भारत आणि मलेशियाने त्यांचे संबंध व्यापक धोरणात्मक भागीदारीपर्यंत वाढवले. पंतप्रधान मोदींच्या भेटीदरम्यान, दोन्ही नेते प्रगतीचा आढावा घेतील आणि या भागीदारीतील भविष्यातील प्राधान्ये निश्चित करतील. भारतात मलेशियन गुंतवणूकीला प्रोत्साहन देणे आणि सखोल आर्थिक सहकार्यासह व्यापार आणि गुंतवणूक वाढविण्यावर चर्चा होणार आहे.

# रितू तावडे होणार मुंबईच्या महापौर उपमहापौर शिवसेनेचे संजय घाडी

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०७ फेब्रुवारी :** मुंबई महानगरपालिकेच्या महापौर निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर आज महापालिका राजकारणात मोठी आणि निर्णायक घडामोड घडली. शहराच्या नेतृत्वाच्या शिखरावर कोण विराजमान होणार, याकडे संपूर्ण मुंबईचे लक्ष लागले असतानाच प्रभाग १३२ च्या नगरसेविका आणि भाजप महिला मोर्चा संयोजिका रितू तावडे यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. तर उपमहापौर पदासाठी संजय घाडी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

महापालिकेतील भाजप पक्ष कार्यालयात पार पडलेल्या नगरसेवकांच्या महत्त्वपूर्ण बैठकीत भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी नगरसेविका रितू तावडे यांचे नाव महापौर पदाच्या उमेदवार म्हणून जाहीर केले. तावडे यांच्या नावाची घोषणा करताच उपस्थित नगरसेवकांनी जोरदार टाळ्या वाजवत पक्षाच्या या निर्णयाचे स्वागत करत त्यांना शुभेच्छा देत





आनंद व्यक्त केला. भाजपच्या या पहिल्या महिला महापौर असून केल्याने राजकीय वर्तुळात उत्साहाची लाट निर्माण केली. या घोषणेमुळे सहकारी नगरसेवक आणि त्यांच्या समर्थकांमध्ये जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. घोषणेनंतर तावडे यांनी पक्षाने सोपवलेली जबाबदारी विश्वासाने पेलण्यासाठी पुढे पक्षाचा विश्वास अधिक दृढ करण्याचां निर्धार व्यक्त करत जय श्रीराम...भारत माता की जय... वंदे मातरम्... डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो.. भारतीय जनता पार्टीचा... देवा भाऊ आहे बढो .. अमित साटम आगे बढो.. या घोषणांच्या गजरात आपला उमेदवारी अर्ज महापालिका सचिव मंजिरी देशपांडे यांच्याकडे अधिकृतपणे सादर केला. याप्रसंगी महापालिका गटनेते गणेश खणकर, उपनगराचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा..माजी खासदार मनोज कोटक.ज्येष्ठ नगरसेवक प्रभाकर शिंदे, शिवसेनेचे गटनेते अमेय घोले, तसेच महायुतीचे नगरसेवक उपस्थित होते.

महापौर पदासाठी ही उमेदवारी ही मुंबईच्या विकासाच्या आणि सक्षम नेतृत्वाच्या दृष्टीने महत्त्वाची महत्वाची मानली जात असून सातम यांनी पक्षाने दाखवलेल्या विश्र्वासाबद्दल पक्ष नेतृत्वाचे आभार मानत त्यांच्या विश्र्वास मुंबईच्या विकासाचा रथ जलदगतीने पुढे नेण्याचा प्रयत्न करत सार्थ ठरवेन अशी प्रतिक्रिया प्रसार माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. दरम्यान, उपमहापौर पदासाठीही एक महत्त्वपूर्ण नाव पुढे आले असून दहिसरमधील नगरसेवक संजय घाडी यांची शिवसेनेच्या वतीने करण्यात आली.

# तेलाची तस्करी करणारी तीन जहाज पकडली

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०७ फेब्रुवारी :** भारतीय तटरक्षक दलानं मुंबईजवळ समुद्रात मोठी कारवाई केली आहे. तेलाची तस्करी करणारी तीन जहाजं तटरक्षक दलानं पकडली आहेत. या जहाजांमध्ये मोठ्या प्रमाणात तेल साठा होता. ही परदेशी जहाजं समुद्रात तेलाची तस्करी करत होती. शुक्रवारी एका जटिल समुद्र–हवाई नेटवर्कवर आधारित ऑपरेशनच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय तेल तस्करी रॅकेटचा पर्दाफाश केला आहे.

रॅकेटचा भाग असलेल्या जहाजांनी संघर्षग्रस्त देशांमधून मोठ्या प्रमाणात स्वस्त तेल आणि तेल आधारित वस्तूंची तस्करी करुन आर्थिक फायदा कमावण्याचा मार्ग निवडला होता. ही जहाजं आंतरराष्ट्रीय समुद्रात वस्तूंची देवाण–घेवाण करायची. या सिंडिकेटमध्ये काम करणारे हस्तक अनेक देशांमध्ये सक्रिय आहेत. जहाजं खोल समुद्रात असताना त्यांच्यात समन्वय राखण्याचं काम हस्तकांकडून केलं जातं.गुरुवारी मुंबईपासून जवळपास १०० नॉटिकल मैलांवर पश्र्चिम दिशेला भारतीय तटरक्षक दलानं तीन जहाजं थांबवली. तटरक्षक दलाचे कर्मचारी या जहाजांवर गेले. त्यांची झडती घेण्यात आली. कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. चालक पथकाची चौकशी केली गेली. त्यातून जहाजांचा वापर तेलाच्या तस्करीसाठी होत असल्याचं स्पष्ट झालं.



भारतीय तटरक्षक दलाच्या टेक–इन्क्लुसिव्ह सिस्टिमनं एका मोटर टँकरचा शोध घेतला. या टँकरच्या हालचाली संशयास्पद होत्या. त्यामुळे जहाजाच्या हालचालींचा डिजिटल तपास सुरु करण्यात आला. त्या जहाजाच्या आसपास असलेल्या अन्य जहाजांचा डेटा पॅटर्न तपासण्यात आला. दोन अन्य जहाजांवरील हालचालीदेखील संशयास्पद आढळून आल्या. त्यांच्याकडून समुद्रात तेलाशी संबंधित वस्तूंची तस्करी सुरु होती. ही जहाजं भारताच्या सागरी सीमा असलेल्या राज्यांमधील शुल्क चुकवण्याचा प्रयत्न करत होती.

# लाडक्या बहिणींसाठी आनंदवार्ता!

## ३१ मार्चपर्यंत आता करता येणार ई–केवायसी

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०७ फेब्रुवारी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसंदर्भात एक मोठी माहिती समोर आली आहे. त्यानुसार आता ज्या लाडक्या बहिणींची ई–केवायसी प्रक्रिया चुकली असेल त्यांच्यासाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत ही दुरुस्ती करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी याची माहिती दिली आहे. त्या यावेळी म्हणाल्या की; मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमुळे राज्यातील लाभार्थी महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे. लाडकी बहीण योजनेची ई–केवायसी प्रक्रिया करताना काही चुकीचे पर्याय निवडले गेल्याने काही महिलांना योजनेचा लाभ मिळणं बंद झालं होतं. पण आता या अर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी पुन्हा संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील खऱ्या लाभार्थ्यांची ओळख पटवण्यासाठी ही प्रक्रिया राबवण्यात आली, ज्यामध्ये काही प्रश्र्न विचारण्यात आले होते. त्यामध्ये एक प्रश्र्न असा होता: तुमच्या घरातले कोणी सरकारी नोकरीत नाही ना? या प्रश्र्नाचे उत्तर देताना असंख्य महिलांनी चूक केली. प्रश्र्न न समजल्याने काही महिलांने या प्रश्र्नाचे उत्तर 'नाही' ऐवजी 'हो' दिले होते. याचा अर्थ असा झाला की संबंधित महिलेनं मान्य केले की त्यांच्या घरातील एखादी व्यक्ती सरकारी कर्मचारी आहे. नियमानुसार घरातील एखादा सदस्य सरकारी कर्मचारी असेल तर संबंधित महिलेला योजनेचा लाभ मिळत नाही, त्यामुळे संगणकीय प्रणालीनुसार लाखो महिलांच्या खात्यात योजनेचे हप्ते येणे आपोआप बंद झाले.

## राष्ट्राच्या पुनर्निर्माण व विकास प्रक्रियेत

# कामगारांचे योगदान सर्वोपरि

## डॉ. मनसुख मांडवीय यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०७ फेब्रुवारी :** पुरी (ओडिशा) येथे भारतीय मजदूर संघाच्या २१व्या त्रैवार्षिक अखिल भारतीय अधिवेशनाचे उद्घाटन केंद्रीय कामगार व रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांच्या हस्ते झाले. राष्ट्राच्या पुनर्निर्माण व विकास प्रक्रियेत कामगार आणि युवा शक्तीचे योगदान सर्वोपरि असल्याचे त्यांनी नमूद केले. विकसित भारताचे ध्येय कामगारांच्या कष्ट, कौशल्य व समर्पणातून साकार होईल, असा विश्र्वास व्यक्त करत नव्या कामगार कायद्यांमुळे समान वेतन, सामाजिक सुरक्षा व भेदभावमुक्त वातावरण बळकट होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



अध्यक्षीय भाषणात भारतीय मजदूर संघाचे अध्यक्ष हिरण्मय पंड्या यांनी संघटनेची वाटचाल मांडत बीएमएस देशातील अग्रगण्य कामगार संघटना असल्याचे सांगितले. एल–२० मंचाचे नेतृत्व मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला.

कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बी. भागय्या, रशियाच्या एफएनआरपीचे अध्यक्ष सर्गे ई चेर्नोगायेव, आयएलओ प्रतिनिधी मिसिको मियामोटो, बीएमएसचे संयुक्त महामंत्री सुरेंद्र पांडेय, महामंत्री रवींद्र हिमते व ओडिशा अध्यक्ष बादल महाराणा उपस्थित होते.

तीन दिवसीय अधिवेशनात २८ प्रांतांतील सुमारे २,५०० प्रतिनिधी सहभागी असून महाराष्ट्रातून अनिल ढुमणे व किरण मिलगीर यांच्या नेतृत्वाखाली १९८ पदाधिकारी उपस्थित आहेत. कंत्राटी कामगारांसह विविध कामगार प्रश्नांवरील महत्त्वाचे प्रस्ताव मांडले जाणार असल्याची माहिती सचिन मेंगाळे यांनी दिली.





भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसीज्ची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत, अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.

लिंक्ड इन्श्युरन्स प्रॉडक्ट्स् हे परंपरागत इन्श्युरन्स प्रॉडक्ट्स् पेक्षा वेगळे असतात आणि हे जोखिम घटकांच्या अधीन असतात.
लिंक्ड इन्श्युरन्स पॉलिसीज् मध्ये भरण्यात येणारे प्रिमियम हे बाजारपेठेतील भांडवल आणि जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्याशी संबंधित गुंतवणूकीच्या जोखमींच्या अधीन असतात. फंडाची कामगिरी आणि भांडवली बाजारपेठ/जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्यावर परिणाम करणारे घटक यांच्या आधारे युनिट्सचा एनएव्ही कमी जास्त होऊ शकतो आणि विमाधारक व्यक्ती ही त्याच्या/तिच्या निर्णयासाठी स्वत:च जबाबदार असते.
लाइफ इन्श्युरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया हे केवळ लाइफ इन्श्युरन्स कंपनीचे नाव आहे आणि प्रोटेक्शन प्लस हे केवळ संलग्न इन्श्युरन्स कॉन्ट्रॅक्टचे नाव आहे आणि त्यातून कॉन्ट्रॅक्टची गुणवत्ता, त्याच्या भविष्यातील संभावना किंवा परतावे या गोष्टी कोणत्याही प्रकारे सूचित होत नाहीत.
कृपया तुमचे विमा एजंट किंवा मध्यस्थ किंवा इन्श्युरन्स कंपनीने दिलेले पॉलिसी डॉक्युमेन्ट यांच्यामधून संबंधित जोखमी आणि लागू होणारे भार यांची माहिती घ्या.
या कॉन्ट्रॅक्ट अंतर्गत देऊ करण्यात येणारे वेगवेगळे फंड्स ही फक्त फंडांची नावे आहेत आणि ती कोणत्याही प्रकारे या प्लॅन्सची गुणवत्ता, त्यांच्या भविष्यकाळातील संभावना आणि परतावे सूचित करीत नाहीत.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## हज यात्रेकरूंसाठी एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ७ फेब्रुवारी :** हज यात्रेवर जाणाऱ्या भाविक यात्रेकरूंसाठी योग्य मार्गदर्शन व तयारी व्हावी, या उद्देशाने बदर वेल्फेअर फाउंडेशन, लातूर यांच्या वतीने एकदिवसीय हज प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून असर नमाजेपर्यंत होणार आहे. शिबिराचे ठिकाण एम. के. फंक्शन हॉल, साठ फूट रोड, लातूर असे आहे.या प्रशिक्षण शिबिरात हज व उमराच्या विधी, एहराम, तवाफ, सई, वकूफ, तसेच मदीना मुनव्वराची जियारत याबाबत सविस्तर व सोप्या शब्दांत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या शिबिरासाठी हजरत मौलाना मुफ्ती आरिफसाहेब (बीड) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच हज कमिटी ऑफ इंडिया, मुंबई यांच्या मान्यताप्राप्त शासकीय हज प्रशिक्षकांकडून देखील मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

हज यात्रेकरूंना आवश्यक असलेले फॉर्म्स शिबिरस्थळी उपलब्ध करून दिले जाणार असून, महिलांसाठी पडद्याची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.संपर्कासाठी अलहाज शुजाउद्दीन साहेब, अलहाज मुज्मिल साहेब यांच्याशी हज यात्रेकरूंनी या प्रशिक्षण शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन बदर वेल्फेअर फाउंडेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# नेत्यांच्या आरोप - प्रत्यारोपात पार पडली निवडणूक

## आमच्या विकास कामांचे काय ? : सुज्ञ मतदारांना पडलेला प्रश्न

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ७ फेब्रुवारी :** जिल्हा परिषद - पंचायत समितीसाठीच्या निवडणुकीचे मतदान शनिवारी उत्साहात पार पडले. ग्रामीण भागाच्या विकासासाठीच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत जवळपास सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी विकास कामांऐवजी परस्परांवर आरोप - प्रत्यारोप करण्यावरच अधिक भर दिल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकास कामांचे काय ? असा प्रश्न सुज्ञ मतदारांना पडल्याचे दिसून आले. मतदारांनी या निवडणुकीत कोणाच्या बाजूने कौल दिला आहे ? या प्रश्नाचे उत्तर सोमवारी दुपारनंतर मिळणार आहे.

लातूर जिल्हा परिषदेच्या ५९ आणि जिल्ह्यातील दहा पंचायत समितीच्या एकूण ११८ जागांसाठी शनिवारी मतदान प्रक्रिया पार पडली. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने या निवडणुकांना महत्व असते. या



निवडणुकीच्या प्रचारादरम्यान संबंधित परिसराच्या विकासाचे मुद्दे प्राधान्याने चर्चिले जाणे अपेक्षित असते. आपला मराठवाडा प्रदेश अगोदरच अविकसित म्हणून ओळखला जातो. विकास कामांच्या अनेक योजना अद्यापही पूर्णत्वास गेलेल्या नाहीत. विकास कामासाठी आलेल्या निधीपैकी बहुतांश निधी अन्य कारणांसाठीच उपयोगात आणला जात असल्याचे सर्वज्ञात आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या विकास कामांमध्येही अनेक वाटेकरी असल्याने बहुतांश योजनांचा बट्याबोळ होत असल्याचेच दुर्दैवाने पाहण्याची पाळी मतदारांवर येऊन ठेपली आहे. रोजगार हमी योजनेपेक्षाही वाईट अवस्था या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पाहायला मिळाल्याचे या ठिकाणी दुर्दैवाने नमूद करावेसे वाटते. रोजगार हमी योजनेबाबत उपहासाने रोजगार हमी - अर्धे तुम्ही अर्धे आम्ही असे म्हटले जात असे. या ठिकाणी अनेकदा 'अर्धेही नाही अशी स्थिती आहे. यामध्ये रस्त्याचे काम पूर्णत्वास गेलेले अहवाल असतात, प्रत्यक्षात दर्शवण्यात आलेला रस्ता केवळ कागदावरच असतो. अशा अनेक घटना केवळ लातूर जिल्ह्यातच नव्हे तर राज्याच्या विविध जिल्ह्यातही घडलेल्या असू शकतात, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीच्या प्रचारात सर्वच प्रमुख राजकीय पक्षांचे नेते सहभागी झाले होते. या प्रचारादरम्यान बहुतांश नेते परस्परांवर आरोप - प्रत्यारोप करण्यात धन्यता मानताना दिसून आले. काहींनी तर अगदी पोरकटपणाही शरमेने मान खाली घालेल, एवढ्या कनिष्ठ स्तरावर जाऊन एकमेकांची असली - नसलेली चालवून घेतली. नेत्यांच्या अशा वक्तव्यांकडे पाहून मतदारांपुढे ही निवडणूक आपल्या ग्रामीण भागाच्या विकास कामांसाठी आहे की नेत्यांना एकमेकांवर तोंडसुख घेण्यासाठी ? असाही प्रश्न पडल्याचे पाहायला मिळाले. नेत्यांना कोणत्या परिस्थितीत कोणते वक्तव्य केले पाहिजे ? याचे प्रशिक्षण त्या - त्या राजकीय पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी देणे आवश्यक असल्याचे यावरून दिसून आल्याच्या प्रतिक्रिया सुज्ञ मतदारातून ऐकायला मिळाल्या. कोणतीही सार्वत्रिक निवडणूक म्हटली की, आरोप - प्रत्यारोप ओघाने आलेच. मात्र, त्यासोबतच विकास कामांनाही प्राधान्य देणे आवश्यक आहे, याकडेही नेत्यांनी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे असते. ग्रामीण भागातील रस्ते, पाणी, वीज असे मूलभूत प्रश्न आजही पूर्णपणे सुटलेले नाहीत. पाणी पुरवठ्याच्या अनेक योजना अपूर्ण आहेत. त्यामुळे पुढील पाच वर्षासाठी निवडून द्यावयाच्या उमेदवारांसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. पण आमच्या विविध प्रलंबित विकास कामांचे काय ? असा प्रश्न सुज्ञ मतदारांना प्रकर्षाने पडल्याचे जाणवले.

## लातुरात मच्छिमार संघर्ष समितीची स्थापना

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ७ फेब्रुवारी :** मच्छिमारांच्या हक्कासाठी येथे संघर्ष समिती स्थापन करण्यात आली. १९६६ पासून मच्छिमारांचा हक्क हिरावल्याचा आरोप संघर्ष समितीतील सदस्यांनी बैठकीत केला. यापूर्वी मच्छिमारीचा ठेका मत्स्य विभागाद्वारे मिळायचा. आता तो गोदावरी व कृष्णा महामंडळाकडे दिल्याने मच्छिमारांतून संताप प्रतिक्रिया उमटत आहेत, अशी माहिती विष्णू पाटील यांनी दिली.गोदावरी महामंडळाने पाणी वाटपाचे धोरण ठरवावे. मच्छिमारीचा ठेका देण्याची व्यवस्था मत्स्य विभागाकडेच असावी, यासंदर्भात, मच्छिमारांच्या हक्कासाठी स्थापन झालेल्या लातूर संघर्ष समितीची बैठक रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता शासकीय विश्रामगृहावर आयोजिली आहे. लातूर जिल्ह्यातल्या १५५ संस्थांच्या पदाधिकारी, सदस्यांनी बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन संघर्ष समितीचे विष्णू पाटील यांनी केले आहे.

## १५० अधिकारी होणार ४०८ ग्रा.प.चे प्रशासक

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ७ फेब्रुवारी :** जिल्हा परिषदेच्या वेगवेगळ्या आस्थापनांतील जवळपास १५० अधिकारी जिल्ह्यातल्या ४०८ ग्रामपंचायतींचे प्रशासक होणार आहेत. गेल्या ४ फेब्रुवारीपासून ग्रामपंचायतींची मुदत संपण्यास प्रारंभ झाला. ३ ते ११ फेब्रुवारी दरम्यान, जिल्ह्यातील ४०८ ग्रामपंचायतींच्या सरपंचांची मुदत संपुष्टात येत आहे. या पार्श्वभूमीवर, जिल्हा परिषदेने पंचायत समित्यांच्या गटविकास अधिकाऱ्यांद्वारे प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया सुरू केली.





एका अधिकाऱ्यांकडे किमान दोन-तीन ग्रामपंचायतींचा प्रशासक म्हणून भार देण्यात येणार आहे. सर्वाधिक लातूर, उदगीर तालुक्यांतील ग्रामपंचायतींच्या सरपंचांची मुदत ३ ते ११ फेब्रुवारीच्या कालावधीत संपत आहे. गेल्या ३ तारखेपासून ग्रामपंचायतींच्या सरपंचांची मुदत संपण्याची प्रक्रिया सुरू झाली. या पार्श्वभूमीवर, लातूर जिल्हा परिषद व गटविकास अधिकाऱ्यांनी मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया सुरू केली.

सध्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून, या निवडणुका संपल्यानंतर ग्रामपंचायतींच्या निवडणुका सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. लातूर जिल्ह्यातील अर्ध्याहून अधिक ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त केले जात आहेत. निवडणूक लांबणीवर पडत असल्याने प्रशासक म्हणून सरकारी अधिकाऱ्यांची नेमणूक केली जात आहे. आदेश न्यायालयाने दिल्याने त्यावर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी कार्यवाही सुरू केली. गतवर्षीच्या डिसेंबर महिन्यापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा माहोल सुरू झाला असून, अजून तो सुरूच आहे. जिल्हा परिषद, पंचायत समितीनंतर ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची धामधूम सुरू होईल. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार स्थानिक प्रशासन निवडणूक प्रक्रियेसंबंधी अंमलबजावणी करीत आहे. या नव्या वर्षातले अर्धे वर्ष निवडणुकीत जाते की काय? अशी चर्चा सुरू झाली आहे. महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व पुढे ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमुळे सर्व शहरी, ग्रामीण वातावरण ढवळून निघाले आहे.

## राज्यस्तरीय सावित्रीच्या लेकी पुरस्काराने डॉ. श्वेता सावंत आणि डॉ. सीमा सावंत सन्मानित

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ७ फेब्रुवारी :** डॉ. ज्ञानोबा कदम यांच्या संकल्पनेतील इंडियन स्टुडन्ट कौन्सिल ही संघटना समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, विज्ञानाभिमुखता व राष्ट्रवाद या मानवी मूल्यांना प्रमाण मानून जनजागृतीचे कार्य गेल्या अनेक वर्षापासून अव्याहतपणे करीत आहे. माहिती आणि तंत्रज्ञान युगातील विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापकांची समतावादी संघटना असून सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, सांस्कृतिक आणि राजकीय अशा विविध मानवी उत्थानाच्या कार्यात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते फुलेवाडा, गंज पेठ, पुणे येथे दरवर्षी सन्मानित व गौरविण्यात येते, यावर्षी लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्रा.



देवदत्त सावंत आणि भाग्यश्री सावंत यांच्या दोन्हीही सुकन्या डॉ. श्वेता सावंत आणि डॉ. सीमा सावंत यांना वैद्यकीय क्षेत्रासाठी सावित्रीच्या लेकी या राज्यस्तरीय पुरस्काराने प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन पुणे येथील क्रांतीबा ज्योतिबा यांच्या फुले वाड्यात प्रसिद्ध अभिनेत्री चिन्मयी सुमित आणि विभावरी देशपांडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी आणि गायक अरुण म्हात्रे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेत्री व रंगकर्मी श्रीमती सुषमा देशपांडे, प्रा. देवदत्त सावंत आणि भाग्यश्री सावंत यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी अभिनेत्री व ज्येष्ठ रंगकर्मी श्रीमती सुषमा देशपांडे, चिन्मयी सुमित, विभावरी देशपांडे, मुंबईच्या माजी महापौर किशोरीताई पेडणेकर, प्रा. डॉ. सरिता मालवीय, प्रा. डॉ. अरुण वाघोळे, प्राची घाणेकर, अस्मिता चांदणे, पल्लवी पुजारी, वैशाली सावळे, कनुजा विमल, प्रज्ञा बाली, प्रा. डॉ. साधना चटलाणी, अंजली कुदरंगी यांनाही विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डॉ. श्वेता सावंत आणि डॉ. सीमा सावंत यांना हा अत्यंत प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल पूज्य भदंत पय्यानंद थेरो व पूज्य भंते बोधिराज यांनी आशीर्वाद रुपी शुभेच्छा तर प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, इंजि. एम. एन. गायकवाड, माजी शिक्षणाधिकारी आर. पी. गायकवाड, प्रो. डॉ. संजय गवई, ममता गवई, देवानंद सावंत, प्रा. राजकुमार बनसोडे, सितम सोनवणे, मिलिंद धावरे आणि सतीश गायकवाड यांनी पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# वन्यजीव प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीचे अनुदान द्यावे- नानाजी खाकरे

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ७ फेब्रुवारी :** लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वन्यजीव प्राण्यांच्या उपद्रवांमुळे मोठे आर्थिक नुकसान होत असून त्याचा फटका सर्वसामान्य शेतकऱ्यांना बसत आहे. याची भरपाई म्हणून सरकारने आर्थिक स्वरूपात मदत करावी अशी मागणी भारतीय किसान संघाचे अखिल भारती जैविक शेती प्रमुख नानाजी आखरे यांनी आयोजीत पत्रकार परिषदेत केली. यावेळी महाराष्ट्र प्रांत संघटन मंत्री चंदन पाटील, जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले, जिल्हा मंत्री सतीश देशपांडे तावशीकर आर्दिची उपस्थिती होती.

भारतीय किसान संघाच्या वतीने लातूर येथील संघ कार्यालयातील जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बैठक आयोजीत करण्यात आली होती. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना शेतीमालाला उत्पादन आधारीत खर्चावर दीडपट अधिक भाव मिळाला पाहिजे अशी किसान संघाची मागणी आहे. भारतीय किसान संघही देशभर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संघर्ष करणारी पक्षविरहीत संघटना आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संस्थापक अध्यक्ष दत्तोपंत ठेंगडी ४ मार्च १९७९ रोजी या संघटनेची स्थापना केली. महाराष्ट्रातील ७० हजार गावांतून ग्रामसमिती नेमली असून त्या समितीमार्फत शेतकऱ्यांना जैविक शेतीसाठीचे मोफत प्रशिक्षण दिले जात आहे. संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविला जातो. शेतकरी एकजुटीसाठी देशभर प्रयत्नशील असलेल्या या संघटनेने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सरकारने एफआरपीनुसार भाव जाहीर करण्या संदर्भात प्रस्ताव दिला होता. त्यानुसार सरकारने एफआरपी दिली असली तरी प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांच्या पदरात काहीही पडत नाही. शासनाने हमीभाव केंद्रे जरी उभारली असली तरी ही खरेदी केंद्रे उशिरा सुरू होत असल्याने व शेतकऱ्यांना मजबुरीने बाजारात माल



विकावा लागतो त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. या नुकसानीची भरपाई म्हणून भावांतर योजनेअंतर्गत मदत द्यावी जेणेकरून सकारला खरेदी केंद्राशी लागणारे मनुष्यबळ व इतर खर्च करावा लागणार नाही. यासाठी आम्ही महाराष्ट्र सरकारकडे भावांतर फरकाचा प्रस्ताव दिला आहे तो अंमलात आणावा, असेही खाकरे यांनी यावेळी नमुद केले. विविध प्रश्नांवर आयोजीत बैठकीत लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रमुख तीन मागण्या समोर आलेल्या आहेत. त्याच्या पूर्ततेसाठी आम्ही जिल्हा प्रशासनाकडे जिल्हाध्यक्षांमार्फत निवेदन देऊन मागणी करणार आहोत. ही मागणी वेळेत पूर्ण न झाल्यास येत्या २४ मार्च रोजी आंदोलन करण्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला.

लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वन्यजीव प्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. या नुकसानीपासून बचाव करण्यासाठी कुंपण योजना सुरू केली असली तरी त्याची तरतूद अत्यल्प आहे. या वन्यजीव प्राण्यांचा सरकारनेच बंदोबस्त करावा अथवा शेतीला कुंपन करण्यासाठी योग्य ती मदत शेतकऱ्यांना करावी. तसेच येणार्या काळात शेतकऱ्यांचा हरभरा हा बाजारात येणार असून त्यासाठी खरेदी केंद्रे तात्काळ सुरू करावीत, जेणेकरून शेतकऱ्यांच्या हातात योग्य मोबदला मिळेल. शासकीय यंत्रणा व त्यात बसलेले अधिकारी हे जाणीवपूर्वक उशिरा खरेदी केंद्र सुरू करतात त्यामुळे नाविलाजास्तव शेतकऱ्यांना कमी भावात माल विकावा लागतो. तसेच शेतकऱ्यांच्या पाणंद रस्त्यांचा विषयही लवकरात लवकर सरकारने सोडवावा. आदी वरील तीन मागण्या या लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या महत्वपूर्ण असून याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा भारतीय संघाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी प्रांताध्यक्ष नवनाथ मद्दे, जिल्हामंत्री सतीश देशपांडे तावशीकर तर कोषाध्यक्ष शेखर मराठे, प्रसिद्धीप्रमुख संजय देशपांडे आदिंची उपस्थिती होती.

## विविध वृत्त...

### होमगार्ड बनसोडे यांचा प्रामाणिकपणा पत्रकाराचा मोबाईल परत केला

**लातूर :** येथील पत्रकार शहाजी पवार यांचा अनावधानाने रस्त्यावर पडलेला मोबाईल हामगार्डच्या सतर्कतेने मिळाला. या प्रामाणिकपणाचे कौतुक होत आहे.

शुक्रवारी (दि.६) रोजी दुपारी शहाजी पवार हे महात्मा बसवेश्वर चौकातून स्कुटवरुन जात होते यावेळी त्यांच्या खिशातील मोबाईल अनावधानाने रोडवर पडला. त्यावेळी म. बसवेश्वर चौकात कर्तव्यावर असलेले होमगार्ड जी.एस. बनसोडे यांना तो सापडला. पवार यांना मोबाईल खिशात नसल्याचे कळाले त्यांनी अन्य मोबाईलवरुन फोन केला व बनसोडे यांनी तो घेतला.त्यांना चौकात मोबाईल सापल्याचे सांगितले. बसवेश्वर चौकातील चौकीत बनसोडे व त्यांचे सहकारी मनोज होळकर यांनी तो पवार यांना दिला. पवार यांनी त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करीत पोलिस अधिक्षक अमोल तांबे यांना याबाबत फोनवरुन सांगितले त्यांनीही बनसोडे यांच्या प्रामिणकपणाचे कौतुक केले.



### विनापरवाना वाहतूक थांबवा

**लातूर :** शहरात विनापरवाना विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थी वाहतूक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शहरात विनापरवाना विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या वाढत चालली आहे. परिवहन विभागाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकृष्ण पाडे, जिल्हाध्यक्ष विनोद करकिले यांनी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

### हवामान बदलाचा हरभऱ्याला फटका

**लातूर :** मागील चार दिवसांपासून जिल्ह्यात हवामान बदलाचा परिणाम दिसून येत आहे. रब्बी हंगामातील हरभरा पिकाच्या मुळाशी बुरशी तयार झाली असल्याचे दिसून येत आहे. त्यातून उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत. जमिनीत अनेक ठिकाणी प्रमाणाबाहेर ओलावा राहिल्याने हरभऱ्याच्या मुळाशी बुरशी वाढत असल्याचे दिसत आहे. त्यातून काही ठिकाणी क्षेत्र बाधित झाले आहे. जिल्ह्यात लवकर पेरणी झालेल्या शेतीतील हरभरा काढणीला आला असून उशिरा पेर झालेल्या शेतकऱ्यांचा हरभरा आणखी फुलोऱ्यात तसेच घाट्यात आला आहे.

### 'दयानंद'मध्ये माहितीपट

**लातूर :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात ५ फेब्रुवारी रोजी हिंदी विभागाच्या वतीने सर्तींदर सरताज यांचे 'हिंद की चादर' या गीताचे व माहितीपटाचे सादरीकरण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या सूचनेनुसार शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदी शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. हिंदी विभाग प्रमुख डॉ. गजानन बने, डॉ. शेटकार रामशेट्टी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमासाठी मानसी गायकवाड, सुनील राक्षे, बालाजी यमपुरे, शंकर भालके यांनी सहकार्य केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते.

### परीक्षा केंद्रांवर प्रतिबंधात्मक आदेश

**लातूर :** इयत्ता बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून सुरू होणार असून ११ मार्चपर्यंत १५२ परीक्षा केंद्रांवर परीक्षा होणार आहेत. तसेच दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्चदरम्यान २५२ परीक्षा केंद्रांवर होणार आहे. या सर्व परीक्षा केंद्रांच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलमानुसार प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर व परिसरात गर्दीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये या परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामुळे परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रवेश करतेवेळी परीक्षार्थी एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत.कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत. परीक्षा केंद्रांच्या परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तिकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करण्यात येणार नाही. १०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील.

### रवींद्र येळनुरकर यांचे निधन

**लातूर :** येथील महसूल कॉलनी परिसरातील रहिवासी तथा अखिल भारतीय स्वातंत्र्य सेनानी समिती, नवी दिल्लीचे सचिव रवींद्र वामनराव येळनुरकर यांचे मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी मारवाडी स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व. रवींद्र येळनुरकर हे ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी डॉ. वामनराव येळनुरकर आणि ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी सरलादेवी येळनुरकर यांचे सुपुत्र होत. अतिशय मनमिळावू स्वभावाचे असणाऱ्या स्व. रवींद्र येळनुरकर यांच्या मित्रपरिवारही खूप मोठा आणि विस्तीर्ण आहे. त्यांच्या निधनाने येळनुरकर परिवारावर शोककळा पसरली असून, सर्व स्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.



राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख व सौ सुवर्णाताई दिलीपराव देशमुख यांनी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी बाभळगाव येथे सपत्नीक मतदानाचा हक्क बजावला.



निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी येथे आज जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी आपला मतदानाचा हक्क बजावला.



मलकापूर येथील एस.टी. कॉलनीतील अंगणवाडी क्र - ३ येथे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी सपत्नीक मतदानाचा हक्क बजावला.



भाजपा नेते लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर या आपल्या गावी कुटुंबीयासमवेत मतदान केले.



लातूर शहराचे आमदार अमित देशमुख यांच्यासह सहकाऱ्यांनी मतदान केले.



आमदार अभिमन्यू पवार यांच्यासह सहकाऱ्यांनी मतदान केले.



लातूर जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब, विलास साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख, सौ सुवर्णाताई दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामीणचे माजी आमदार धीरज विलासराव देशमुख सौ दीपशिखा धीरज देशमुख यांनी बाभळगाव येथे कुटुंबासह मतदान करून लोकशाहीच्या उत्सवात सहभाग नोंदवला आहे.



दैठणा ता शिरूर आनंतपाळ येथे मतदानात महिलांचा सक्रिय सहभाग असलेला दिसून आला

# जि.प.-पं.स. मतदानाचा बाजारपेठेवर परिणाम

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ०७ फेब्रुवारी :** नुकत्याच अहमदपूर नगर परिषद निवडणूका पार पडल्या त्या वेळी अहमदपूर शहर बाजारपेठेत नागरिकांची गर्दी होती पण आज ७ फेब्रुवारी ला लातूर जिल्हा परिषद व अहमदपूर पंचायत समितीच्या निवडणुकीचे मतदान होत असल्याने अहमदपूर बाजारपेठेत शुकशुकाट जाणवत आहे.

अहमदपूर तालुक्यातील ६ जी.प गट व १२ पंचायत समिती गणा साठी हे मतदान होत आहे.

जिल्हा परिषद गट _ खंडाळी, हडोळती, शिरूर ताजबंद, अंधोरी, किनगाव, रोकडा सावरगाव पंचायत समिती गण खंडाळी,उजना, हाडोळती, कुमठा ( बु), वळसंगी, शिरूर ताजबंद, थोडगा, अंधोरी,किनगाव, धानोरा ( बु ), सावरगाव रोकडा, काजळ हिप्परगा, या ठिकाण च्या २०० मतदान केंद्रावर एकूण १६०६९३ मतदार आपला मतदान हक्क बनवणार आहेत.

या मतदान प्रक्रिये साठी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून यंत्रणेचे स्वरूप आणि मनुष्यबळ निवडणूक प्रक्रियेसाठी एकूण २०० मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली असून, प्रत्येक केंद्रावर ४ कर्मचारी व १ पोलिस कर्मचारी याप्रमाणे एकूण १००० कर्मचाऱ्यांची (२०० टीम) नियुक्ती करण्यात आली आहे. कोणत्याही आपत्कालीन स्थितीसाठी अतिरिक्त २० रिझर्व टीम देखील तैनात ठेवण्यात आल्या आहेत.

या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी आणि नियोजनासाठी आय.टी.आय. येथील केंद्रावर खालील वरिष्ठ अधिकारी उपलब्ध आहेत.

मंजुषा लटपटे: उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी.उज्वला पांगारकर: तह-सीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी. अरविंद रायबोले: उपविभागीय पोलीस अधिकारी. विनोद म्हैत्रेवार :पोलीस निरीक्षक.

एस टी आगार प्रमुख : अमर पाटील

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी विविध विभागांची जबाबदारी नायब तहसीलदारांकडे सोपवण्यात आली आहे.

क्षेत्रीय स्तरावरील नियोजन

संपूर्ण मतदारसंघावर देखरेख ठेवण्यासाठी एकूण २४ झोनल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच, या झोनल अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना तांत्रिक मदत करण्यासाठी २४ मास्टर ट्रेनर यांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे, ज्यामुळे मतदान प्रक्रियेत कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही.

प्रशासनाने मतदारांना निर्भयपणे मतदान करण्याचे आवाहन केले असून, सर्व केंद्रांवर चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून

यंत्रणेचे स्वरूप आणि मनुष्यबळ निवडणूक प्रक्रियेसाठी एकूण २०० मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली असून, प्रत्येक केंद्रावर ४ कर्मचारी व १ पोलिस कर्मचारी याप्रमाणे एकूण १००० कर्मचाऱ्यांची (२०० टीम) नियुक्ती करण्यात आली आहे. कोणत्याही आपत्कालीन स्थितीसाठी अतिरिक्त २० रिझर्व टीम देखील तैनात ठेवण्यात आल्या आहेत.

या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी आणि नियोजनासाठी आय.टी.आय.



येथील केंद्रावर खालील वरिष्ठ अधिकारी उपलब्ध आहेत

मंजुषा लटपटे: उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी.उज्वला पांगारकर: तह-सीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी. अरविंद रायबोले: उपविभागीय पोलीस अधिकारी. विनोद म्हैत्रेवार :पोलीस निरीक्षक.

एस टी आगार प्रमुख : अमर पाटील

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी विविध विभागांची जबाबदारी नायब तहसीलदारांकडे सोपवण्यात आली आहे.

क्षेत्रीय स्तरावरील नियोजन

संपूर्ण मतदारसंघावर देखरेख ठेवण्यासाठी एकूण २४ झोनल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच, या झोनल अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना तांत्रिक मदत करण्यासाठी २४ मास्टर ट्रेनर यांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे, ज्यामुळे मतदान प्रक्रियेत कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही.

## दैठणा येथे मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली



**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. ०७ फेब्रुवारी :** ७ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या येरोळ जिल्हा परिषद व येरोळ पंचायत समिती गणाच्या निवडणुकीत दैठणा गावात मतदान प्रक्रिया अत्यंत शांततेच्या आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सकाळपासूनच मतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत होते.

या निवडणुकीत काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टी या दोन राष्ट्रीय पक्षांमध्येच खरी लढत पाहायला मिळाली. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी संयम राखत कोणताही अनुचित प्रकार न घडू देता शांततेत मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी सहकार्य केले.

मतदान सुरू झाल्यानंतर सकाळी दहा वाजेपर्यंत तरुण मतदारांचा सहभाग लक्षणीय होता. त्यानंतर दहा वाजल्यानंतर महिला मतदारांचा सहभाग वाढताना दिसून आला. दुपारी तीन वाजेपर्यंत महिला मतदारांची संख्या अधिक होती. त्यानंतर संध्याकाळच्या सुमारास एकूण मतदारांची संख्या हळूहळू कमी होत गेली.

एकूणच दैठणा गावात कोणताही अनुचित प्रकार न घडता, सौहार्दपूर्ण व शांत वा-तावरणात मतदान प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली.

## अशोक पाटील यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ०७ फेब्रुवारी :** चाकूर तालुक्यातील राचन्नावाडी येथील अशोक श्रिराम पाटील यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी शुक्रवारी दिनाक ०६ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री दुखद निधन झाले.त्यांच्यावर राचन्नावाडी येथील स्वतःच्या शेतात शनिवारी दिनांक ०७ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्र्चात पत्नी केराबाई,दोन मुले,एक मुलगी,भाऊ,बहीणी,सुना,नातवंडे असा मोठा परीवार आहे.ते सुभाष पाटील मुख्यलिपीक,मुंबई महानगर पालिका यांचे ते वडील होत.अंत्यसंस्कारास राचन्नावाडी आणि परिसरातील नागरिक,नातेवाईक,मित्रमंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०७ फेब्रुवारी :** येथील महाराष्ट्र उदयगिरी कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप व शुभेच्छा समारंभ उत्सा-हात पार पडला. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य एस. जी. कोडचे होते. मंचावर पर्यवेक्षक प्रा. एस. व्ही. मूडपे व परीक्षाप्रमुख प्रा. पी. वाय. जालनापुरकर यांची उपस्थिती होती. या वेळी बोलताना प्रा. मूडपे म्हणा-ले, आजचा विद्यार्थी उद्याचा भारताचा जबाबदार नागरिक आहे. भविष्यातील संधींबाबत त्यांनी मौलिक मार्गदर्शन केले. समारोपात प्रा. कोडचे म्हणा-ले, यश प्राप्तीसाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य, शिस्त व कठोर परिश्रम करणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांच्या वती-ने हर्षवर्धन कांबळे, अनिकेत येलमटे, चैतन्य कांबळे, शिव-ानी कंटे व प्रतीक्षा सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी वर्षभरातील विविध परीक्षांतील यशस्वी विद्यार्थ्यांचा ग्रंथ भेट व पुष्पहाराने गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. प्रवीण जाहुरे व प्रा. सचिन कांबळे यांनी तर आभार प्रा. नागनाथ खांडेकर यांनी मानले.

## होळकरी दौलतीची यशवंत पराक्रमी गाथा म्हणजे झुंज होय : प्रा. कुमनाळे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०७ फेब्रुवारी :** परकीयांच्या आक्रमणाचा राक्षस आ वासून उभा असतानाच होळकरी दौलती मध्ये माजलेली अंधाधुंदी, बेदीली, गैरशिस्त आणि बंड या सर्वांना तोंड देत आपल्या स्वबळावर स्वराज्यासाठी यशवंतराव होळकरांनी गाजवलेल्या यशवंत पराक्रमाची गाथा म्हणजे झुंज होय. असे मत प्रा.अशोक कुमनाळे यांनी व्यक्त केले.





गेल्या पंधरा वर्षापासून अखंडितपणे चालू असलेल्या चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत डॉ. विठ्ठल गोरे यांच्या अध्यतेखाली संपन्न झालेल्या वाचक संवादचे ३५४ वे पुष्प प्रा.अशोक कुमनाळे यांनी झुंज या ना. स. इनामदार लिखित ऐतिहासिक कादंबरीवर बोलताना ते म्हणाले की यशवंतराव होळकर यांचे चरित्र आणि इतिहास पाहता त्यांच्या पराक्रमातील क्रौर्य, त्यांनी लढलेल्या लढाया याबरोबरच स्थानिक परिस्थितीत त्यांचे नातलग व इतर समाजाशी जपलेले संबंध. त्यामध्येच ब्राह्मणी सरदाराकडून हीन संबोधने, विशिष्ट पद्धतीत झालेले त्यांचे लग्न आणि पेशवाईशी करावा लागलेला समेट. तरीदेखील त्यांची स्वराज्याबद्दलची तळमळ लक्षात घेता त्यांचे चरित्र एवढे मोठे आहे की, अंतकरणाचा उदार, गरीबाचा कनवाळू, स्वतःच्या सुखाविषयी निरीच्छ, तरीपण समरांगणी कर्दनकाळ अशी ज्यांची ओळख. आपल्या या सर्व सदगुनांचा राष्ट्र कार्यासाठी उपयोग करून घेणारा चतुर कर्तबगार शूर मुत्सद्दी म्हणजे यशवंतराव होळकर होते.

या संवादानंतर झालेल्या चर्चेत अनेकांनी सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थितांना जन्मदिनाची ग्रंथ भेट देण्यात आली. शेवटी अध्यक्षीय समारोपात डॉ. विठ्ठल गोरे म्हणाले, झुंज ही शुद्ध ऐतिहासिक कादंबरी आहे. आजच्या या संवादमुळे यशवंतराव होळकरांचे स्मरण झाले, प्रत्येकाने असे ग्रंथ वाचले पाहिजेत.

शासकीय दूध डेअरीच्या सभागृहात संपन्न झालेल्या या अत्यंत प्रभावी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुरलीधर जाधव यांनी केले, संवादकांचा परिचय प्रा देवशेट्टे यांनी करून दिला. शेवटी आभार प्रकाश बिरादार यांनी मानले.

## गुलाबी मतदान केंद्र व आदर्श मतदान केंद्रास जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे व निवडणूक निरीक्षक ज्योती पाटिल यांनी दिली भेट

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. ०७ फेब्रुवारी :**जिल्हा परिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या निमित्ताने आज दिनांक ७ फेब्रुवारी रोजी मतदान संपन्न होत आहे .त्यानिमित्ताने लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी गव्हाण येथील गुलाबी मतदान केंद्रास (सखी मतदान केंद्र ) भेट दिली. तसेच निवडणूक निरीक्षक तथा अपर जिल्हाधिकारी धाराशिव ज्योती पाटिल यांनी गुलाबी मतदान केंद्र व आदर्श मतदान केंद्र समसापूर येथे भेट देउन पहाणी केली व दिव्यांग रँप, आरोग्य पथक व सुरळीत मतदान पाहून समाधान व्यक्त केले .त्यांच्यासोबत निवडणूक निर्णय अधिकारी संदीप कुलकर्णी,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत थोरात, तहसिलदार रामेश्वर स्वामी, गटविकास अधिकारी संतोष माने, स्वीप सदस्य मंगेश सूवर्णकार, अमृतेश्वर स्वामी यांची उपस्थिती होती.



संपूर्ण मतदान केंद्र गुलाबी रंगांनी सजविले होते गुलाबी रंगाची फुग्याची कमान, गुलाबी वेशभूषेतील महिला मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, रंगीत रांगोळी व मतदान केंद्र गुलाबी रंगांनी सजविले असल्यामुळे मतदारांमध्ये उत्साह दिसून येत होता. मतदानाकडे जास्तीत जास्त महिला आकर्षित व्हाव्यात महिलांच्या मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून गुलाबी मतदान केंद्राचे नियोजन करण्यात येते. याप्रसंगी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी मतदारांशी संवाद साधला व मोठ्या प्रमाणावर येत असलेल्या महिला मतदारांचा उत्साह वाढविला यामुळे निश्र्चितच या निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी वाढेल व लोकशाही यशस्वी व बळकट होण्यासाठी मदत होईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

# त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त 'पंचशील' ध्वजारोहण करून केले अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. ०७ फेब्रुवारी :** भार-तरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धांगिनी त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आज शिरूर अनंतपाळ येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तथा प्रवक्ते महाराष्ट्र राज्य व शिरूर अनंतपाळ तालुक्याचे भुमी पुत्र मा. श्री. सुरज दादा चव्हाण व भारतीय जनता पार्टीचे युवा नेते आमचे मार्गदर्शक मा. श्री. अरविंद भैया पाटील निलंगेकर यांच्या शुभहस्ते 'पंचशील' ध्वजारोहण करून अभिवादन केले.

यावेळी बाबासाहेब व माता रमाई च्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला.

यावेळी - माजी नगराध्यक्ष विशाल गायकवाड, माजी सरपंच मुकेश गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सचिव - तुषार मादळे, निलंगा माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अनिल देवंगरे, न.पं.सभापती बाळूभाऊ शिवणे, श्री. धोंडिराम सांगवे, श्री. शंकर बेंबळगे,नगरसेवक न. पं. श्री. ओम बर्गे, नगरसेवक न.पं. श्री. दत्ता शिंदे, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष श्री. बबन होनमाने, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष श्री. गणेश सलगरे, युवा नेते गणेश कांबळे, माता रमाई जयंतीचे अध्यक्ष शुभम गायकवाड, श्री. गौतम कांबळे विशाल गिलचे, संयाजी गायकवाड, रोहित गायकवाड, योगेश माने. राहुल मादळे, शाव-लीन मादळे, प्रिन्स बानाटे, प्रज्योत कांबळे, हर्षवर्धन गायकवाड, चंद्रकांत कांबळे, हुसेन मादळे, अविनाश जाधव, विष्णू गायकवाड, बाळू कांबळे, राधेश नाब्दे आदी मान्यवर उपस्थित होते.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# ...इतिहासातील काळी पानेच वाढतील

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी लोकसभेत या आठवड्यात झालेला गोंधळ देशातील तमाम जनतेला वेदना देणारा आहे. लोकसभेत काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांचे असंसदीय वर्तन 'गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ' या म्हणीची आठवण करून देणारा म्हणावा लागेल. लोकसभेत यावेळी झालेला गोंधळ हा संसदीय इतिहासातील काही पहिला गोंधळ नव्हता आणि तो शेवटचाही नसणार. संसदेच्या प्रत्येक अधिवेशनात गोंधळ ठरलेला असतो. गोंधळाला जबाबदार असलेल्या विरोधी पक्षांच्या सदस्यांना निलंबितही केले जाते. यावेळी काँग्रेसच्या आठ सदस्यांना निलंबित करण्यात आले. आजकाल निलंबित केलेल्या सदस्यालाही त्याचे फारसे वाईट वाटत नाही. आपले निलंबन तो मोठ्या अभिमानाने मिरवत असतो. गोंधळ आणि गदारोळाशिवाय संसदेचे अधिवेशन पार पडूच शकत नाही, असे गृहीत धरण्यासाठी परिस्थिती आहे. परंतु, जे काही घडले, ते कोणत्याही लोकशाहीवादी नागरिकास चिंतेत पाडेल असेच होते.

लोकशाहीत आजचे विरोधक उद्याचे सत्ताधारी असतात, तर आजचे सत्ताधारी उद्याचे विरोधक असतात, असे मानले जाते. त्यामुळे सभागृहात गोंधळ घालण्याची संधी आलटून-पालटून सर्वांनाच मिळत असते. यावेळी काँग्रेसच्या सदस्यांनी घातलेला गोंधळ मात्र लोकसभेसारख्या राष्ट्रीय सभागृहाच्या मर्यादा तसेच प्रतिष्ठेचे चिरहरण करणारा तसेच संसदीय लोकशाहीची प्रतिष्ठा धुळीस मिळवणारा होता. ज्या जनतेने काँग्रेसच्या अशा सदस्यांना निवडून दिले, त्यांना आपण कशा दिवट्या आणि नतद्रष्ट माणसांना निवडून दिले, असे या सदस्यांचे सभागृहातील वर्तन पाहून वाटत असेल. अध्यक्ष वा सभापतींच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत येऊन पोस्टर्स फडकवणे, घोषणा देत कामकाजात अडथळा आणणे हे संसदीय प्रथा आणि परंपरेच्या विरोधात असले तरी त्याची सवय झालेली होती. पण अलिकडे लोकसभेत जे काही घडले, ते इतकेच नव्हते. त्याच्याही पलीकडचे होते. विरोधकांना सरकारच्या चुकीच्या धोरणांना-निर्णयांना विरोध करण्याचा, सरकारचा निषेध करण्याचा आणि त्यासाठी रस्त्यावर उतरून आवश्यकतेप्रमाणे निदर्शने आणि आंदोलन करण्याचा निश्चितपणे अधिकार आहे. पण लोकसभा वा राज्यसभेला रणांगण बनवण्याचा अधिकार त्यांना नाही. तसा तो कुणालाही नाही. लोकसभेत चर्चा करून आपल्या मतदारसंघातील तसेच देशातील प्रश्न मांडण्यासाठी जनतेने या लोकप्रतिनिधींना निवडून दिले आहे. संसदेचे सभागृह चर्चेसाठी असते. ते कायदा बनवणारे देशातील सर्वोच्च व्यासपीठ आहे. कायदा बनवणाऱ्या या सभागृहात काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी कायदाच पायदळी तुडवला. या सदस्यांचे वर्तन महाविद्यालयीन निवडणुकीच्या वेळी हुल्लडबाजी करणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा वेगळे नव्हते.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा अट्टहास या सगळ्या गोंधळाला कारणीभूत आहे, असे म्हटले पाहिजे. माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील मजकुराचा सभागृहात उल्लेख करण्यापासून सभापतींनी त्यांना रोखले होते. संसदीय सभागृहात पीठासीन अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असतो. पण त्यांच्या निर्देशांचे वारंवार उल्लंघन करीत त्याबाबत उल्लेख करण्यावर राहुल गांधी अडून बसले. त्यामुळे राहुल गांधी यांना स्वत:चेही भाषण पूर्ण करता आले नाही. त्यांनी अन्य सदस्यांनाही भाषण करू दिले नाही. सभागृहाचे कामकाज वारंवार स्थगित करावे लागल्यामुळे प्रश्नोत्तराच्या तसेच शून्य तासाचे कामकाज होऊ शकले नाही. यामुळे सभागृहात तयारी करून येणाऱ्या सदस्यांची निराशा झाली. त्यांना आपल्या मतदारसंघातील जनतेचे मुद्दे सभागृहात मांडता आले नाहीत. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर झालेल्या चर्चेला पंतप्रधान उत्तर देत असतात, त्यानंतर हा प्रस्ताव पारित केला जातो. पण यावेळी लोकसभेत पंतप्रधानांच्या चर्चेच्या उत्तराच्या भाषणाशिवायच हा प्रस्ताव पारित करावा लागला. हा एक प्रकारे राष्ट्रपतींचा अपमान आहे. आपल्या राष्ट्रपती महिला आहेत. काँग्रेसने एका महिलेचा अपमान केला, असा अर्थ राहुल गांधी यांच्या वर्तनावरून काढणे शक्य आहे. काँग्रेसने हेही लक्षात ठेवले पाहिजे की, त्या पक्षाचे नेतृत्वही आतापर्यंत एका महिलेकडे होते. त्यामुळे काँग्रेसचे हे वर्तन जास्त आक्षेपार्ह ठरते. राहुल गांधी यांना जो मुद्दा मांडायचा होता, तो ते अन्य संसदीय आयुधांच्या माध्यमातूनही मांडू शकले असते. परंतु, राहुल गांधी यांचा उद्देश सभागृहाचे कामकाज सुरळीत चालविण्याऐवजी कामकाजात अडथळा आणण्याचाच जास्त दिसत होता. त्यांचे वर्तन डिवचणे आणि चिडविण्याच्या थाटातले होते. अशा स्थितीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी चर्चेचे उत्तर देणार असताना काँग्रेसच्या सदस्यांनी सत्ताधारी बाकांच्या बाजूला पंतप्रधानांच्या आसनाच्या दिशेने धाव घेत आणि बॅनर फडकवत त्यांना घेराव घालण्याचा जो प्रकार केला, त्याचे कोणत्याही स्थितीत समर्थन करता येत नाही. यामुळे पंतप्रधानांच्या सुरक्षेला गंभीर धोका उत्पन्न होण्याची शक्यता होती. लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी आपल्या वक्तव्यात हीच भीती व्यक्त केली. मुळात काँग्रेसच्या आणि त्यातही त्यांच्या महिला सदस्यांचा आवेश पाहून काही तरी अप्रिय घटना घडणे अशक्य नव्हते. ओम बिर्ला ज्या अप्रिय प्रसंगाचा उल्लेख करतात, तो पंतप्रधानांच्या जिवाला काँग्रेस सदस्यांकडून होणारा संभाव्य धोका होता. विरोधी पक्ष नेते म्हणून राहुल गांधी यांनी आपल्या सदस्यांना आवरायला हवे होते, पंतप्रधानांच्या आसनाजवळ जाण्यापासून रोखायला हवे होते. पण राहुल गांधी यांची या साऱ्या प्रकाराला चिथावणी होती, असे घटनाक्रमावरून दिसून येते. राज्यसभेचे नेते जे. पी. नड्डा यांनी राहुल गांधी यांचा उल्लेख उपरोधाने 'अबोध बालक' असा केला असला तरी हे बालक अबोध नाही तर मोठे घातक दिसत आहे. राहुल गांधी यांनी काँग्रेस पक्षाला तर ओलिस धरले आहे. आता त्यांना संसदेलाही ओलिस धरायचे होते, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. त्यामुळे अशा घातकी बालकाला काँग्रेसचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी आवरावे, असे आवाहन संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांना करावे लागले.

काँग्रेसमध्ये आतापर्यंत अनेकांनी विरोधी पक्षनेतेपद सांभाळले, पण या पदाचे जेवढे अवमूल्यन राहुल गांधींनी केले, तेवढे याच्या आधी दुसऱ्या कोणी केले नाही. राहुल गांधी ही गांधी घराण्यासाठीच नाही तर काँग्रेस पक्षासाठीही मोठी डोकेदुखी झाली आहे. काँग्रेसमधील नेत्यांची स्थिती सहन करता येत नाही आणि सांगताही येत नाही, अशी झाली आहे. राहुल गांधी म्हणजे काँग्रेस पक्षासाठी अडचणीच्या जागेचे दुखणे झाले आहे. सांगता येत नाही आणि दुर्लक्षितही करता येत नाही असे हे दुखणे. राहुल गांधी यांच्या अशा मनमानी आणि अनिर्बंध वागणुकीला कंटाळूनच आतापर्यंत अनेक नेत्यांनी काँग्रेस पक्षाला रामराम ठोकला. तरीही काँग्रेसला आणि त्याच्या नेतृत्वाला शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते. संसदेत सदस्यांना विशेषाधिकार असल्यामुळे काँग्रेस सदस्य यावेळी बचावले आहेत. संसदेच्या सभागृहाबाहेर त्यांनी अशी कृती केली असती तर कदाचित कठोर कायदेशीर कारवाई त्यांच्यावर झाली असती. लोकसभेच्या गोंधळी पृष्ठभूमीवर ज्येष्ठांचे सभागृह असलेल्या राज्यसभेचे वर्तन प्रतिष्ठेला साजेसे राहिले. राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर जवळपास चार दिवस प्रदीर्घ चर्चा झाली आणि या चर्चेला पंतप्रधान मोदी यांनी खणखणीत आणि सणसणीत उत्तर दिले. ''काँग्रेस माझी कबर खोदण्याच्या मागे लागली आहे'', असा जो आरोप मोदी यांनी केला, त्यावर काँग्रेस सदस्यांचे लोकसभेतील अनियंत्रित वर्तन पाहून विश्वास बसतो. टीकेचा-आरोपाचा अधिकार असूनही विरोधकांच्या वर्तनात विधायकता अपेक्षित आहे. संसदीय मूल्यांचा सन्मान अपेक्षित आहे. या अधिवेशनातील काँग्रेस सदस्यांचे वर्तन कोणत्याही अर्थाने संसदीय परंपरांचा सन्मान करण्याचे नव्हते. उलट ते सभ्यतेच्या संकेतांच्या विरोधात जाणारे होते. विरोधी पक्ष म्हणून काँग्रेस असे घातकी नवीन पायंडे घालून देण्याचा प्रयत्न करीत असेल तर काँग्रेसच्या नावे आधीच असलेली इतिहासातील काळी पानेच वाढतील. बाकी पक्ष वाढण्याचा प्रश्नच उद्भवत नाही!

## यंगिस्तान

# यांना माणूस तरी का म्हणावे ?

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

'बिलक ट्राइस' हा २०२४ सालचा एक सायकॉलॉजिकल थ्रिलर चित्रपट आहे. या चित्रपटात स्लेटर किंग नावाचा एक टेक बिलियनिअर आहे, ज्याच्यावर कंपनीतील गैरकृत्याचे आरोप लागले आहेत. पण या आरोपांमुळेच त्याने कंपनी सोडली आणि त्यानंतर तो सुधारण्याचा प्रयत्न करतोय. तो काही सायकॉलॉजिकल सेशन्स अटेंड करतोय, जेणेकरून तो या सर्व गोष्टींतून बाहेर पडू शकेल आणि एक सज्जन माणूस म्हणून जगू शकेल. चित्रपटाची कथा फ्रिडा आणि तिची मैत्रीण जेसभोवती फिरते. त्या दोघी एका ग्लॅमरस इव्हेंटमध्ये वेट्रेस म्हणून काम करतात. तिथे तो बिलियनियर त्यांना भेटतो, त्यांची चांगली ओळख होते आणि तो त्यांना त्याच्या खाजगी आयलंडवर वीकेंडला येण्यासाठी आमंत्रित करतो. या आयलंडचं वर्णन दुसरा स्वर्ग असंच केलं जातं. लग्जरी, पार्टी, ड्रग्स, अल्कोहोल, सुंदर कपडे, अनलिमिटेड खाणं-पिणं सगळं काही इथे आहे. अतिशय सामान्य आयुष्य जगणाऱ्या फ्रिडा आणि जेसला हा स्वर्ग आवडतो. पण हा स्वर्ग पुढे नरकात बदलतो. त्यांचे फोन घेतले जातात आणि बाहेरच्या जगाशी संपर्क तुटतो. दिवसभर पार्टी चालते, पण रात्री भयानक गोष्टी घडतात; मुलींवर रात्री अमानुष असे लैंगिक अत्याचार होतात, शोषण केलं जातं. सकाळी उठल्यावर त्यांच्या आठवणी मिटवल्या जातात. कारण त्यांना ड्रग्ज दिलेलं असतं. रात्री काय घडलं हे त्यांना सकाळी आठवत नाही आणि त्या अगदी नॉर्मल वागू लागतात. हे या आयलंडवर अनेक वर्षांपासून सुरू असतं. लैंगिक अत्याचार झालेल्या मुलींना नंतर पुन्हा त्यांच्या जगात सोडलं जातं. पण त्यांना जाणीवच नसते की त्यांच्यासोबत नेमकं काय झालंय.

मानवता ही एक अशी संकल्पना आहे जी आपल्याला इतर प्राण्यांपासून वेगळी ठरवते. दया, करुणा, न्याय आणि नैतिकतेच्या आधारावर मानवता उभी आहे. आपल्याकडे 'दया, क्षमा, शांती तेथेचि देवाची वस्ती' असं म्हटलं जातं. पण जेव्हा आपण जगातील काही घटना पाहतो, तेव्हा हा प्रश्न मनात येतो की, काही लोकांना खरंच 'माणूस' म्हणायचे का? जेफ्री एपिस्टिन प्रकरण हे असेच एक काळे पान आहे. हे प्रकरण आणि या माणसाबद्दलची माहिती आणि त्याच्या काळ्या कारस्थानांची माहिती जसजशी समोर येत आहे, तसतसे थक्क करणारी, थरकाप उडवणारी तथ्ये समोर येत आहेत आणि आपल्याला प्रश्न पडतोय की खरोखर हे शक्य आहे काय? पण हे गुन्हे त्याने एकट्याने केलेले नाहीत. तर यात अशा व्यक्तींची नावे आली आहेत, ज्यांना आपण आदर्श मानतो. ज्यात श्रीमंत, प्रभावशाली लोक, नेते, कलाकार, प्रेरणा देणारे लोक या प्रकरणात गुंतलेले आहेत. बिल गेट्स यांचेही नाव आले होते. मात्र त्यांनी याबाबत खंत व्यक्त केलीय आणि आपण कधीही त्याच्या आयलंडवर गेलो नाही असे स्पष्टीकरण दिले. तसेच स्टीफन हॉकिंग, बिल क्लिंटन, चॉमस्की, ट्रम्प अशी अनेक नावे आहेत. अर्थात या सर्वांनीच गैरकृत्य केले असेल असे नव्हे. पण या गैरकृत्यामध्ये अनेक बड्या लोकांचा सहभाग आहे. हे गैरकृत्य करण्यासाठी एपिस्टिनने एक भव्य आयलंड घेतलं होतं. या आयलंडला लिटल सेंट जेम्स किंवा एपिस्टिन आयलंड म्हणतात.

एपिस्टिन हा एक श्रीमंत फायनान्शियर, ज्याचे जगातील अनेक मोठ्या व्यक्तींशी संबंध होते. त्याच्या आयुष्यात पैसा, सत्ता आणि विलास होता. पण या सगळ्या मागे लपलेली एक काळी बाजू होती, बाल लैंगिक शोषणाची. अमेरिकन न्याय विभागाने जारी केलेल्या दस्तावेजांमध्ये अनेक पीडितांच्या साक्षी आहेत. या पीडित, ज्या बहुतेक अल्पवयीन मुली होत्या, त्यांना जबरदस्तीने एपिस्टिनच्या जाळ्यात ओढले गेले. त्याच्या खाजगी बेटावर हे अत्याचार घडत होते. एका पीडितेने सांगितले की, तिला १४ वर्षांची असताना एपिस्टिनने भेटवस्तू देऊन फसवले आणि नंतर तिचे शोषण केले. असंही वाचण्यात आलं की, एपिस्टिनच्या पार्ट्यांमध्ये अल्पवयीन मुलींना जबरदस्तीने आणले जायचे. त्या मुलींना ड्रग्स देऊन, धमकावून शांत ठेवले जायचे. त्यांच्या शरीराशी खेळ खेळले जायचे, जणू की ते माणूस नसून, लहान मूल नसून एक खेळणं आहे. ते एक खेळणं आहे म्हणून ते त्या खेळण्याशी कसेही खेळायचे. मग खेळताना एखादं खेळणं तुटलं तर काय फरक पडतोय ना? या लहान मुलांना कळतही नसेल की त्यांच्यासोबत नेमकं काय घडतंय. त्यांच्या डोळ्यातील भीती, वेदना, सुटण्यासाठीची त्यांची धडपड - कल्पना करूनच मनाचा थरकाप उडतो. काही महिन्यांपूर्वी मुंबईत एका पीडित मुलीच्या वडिलांच्या वकिलांनी एका बड्या नेत्याच्या मुलावरही अशा प्रकारचे आरोप केले होते. त्या आरोपात किती तथ्य आहे, त्या आरोपाचे पुढे काय झाले, कुणास ठावूक. मात्र श्रीमंती म्हणजे शोषण, विकृतपणा असतो का? एक श्रीमंत माणूस चांगला सज्जन असू शकत नाही का? असा प्रश्न पडू लागला आहे. एपिस्टिनने एक संपूर्ण नेटवर्क तयार केले होते, ज्यात मुलींना रिक्रूट करणे, त्यांना लैंगिक बाहुली म्हणून प्रशिक्षण देणे आणि मग प्रभावशाली लोकांना 'भेट' म्हणून देणे. हे सेक्स ट्रॅफिकिंगचे एक मोठे प्रकरण आहे. आपल्या भारतातही अनेक मुली, मुलं अचानक बेपत्ता झाल्याची प्रकरणे समोर येतात. त्यांना सुद्धा अशाच कोणत्या तरी एपिस्टिनच्या बेटावर नेले जात असेल का? त्यांचेही असेच शोषण होत असेल का? कल्पना करूनच भीती वाटते. हे सर्व वाचताना मनात राग येतो, दुःख होते. त्या मुलींच्या आई-वडिलांना काय वाटले असेल? त्यांच्या बालपणाचे काय झाले असेल? अशी अनेक उदाहरणे आहेत. या प्रकरणातील दस्तावेज लाखो पानांमध्ये पसरलेले आहेत, ते वाचताना मन सुन्न होऊन जाते. अशा लोकांना माणूस म्हणणे हा मानवतेचा अपमान नाही का? कल्पना करा, एक लहान मुलगी, जिने अजून जग पाहिलेले नाही, तिला सत्ता आणि पैशाच्या जोरावर गुलाम बनवले जाते. तिच्या स्वप्नांचा चुराडा केला जातो, तिच्या बालपणाला चिरडले जाते. ती रडते, ओरडते, पण कोणी ऐकत नाही. कारण हे लोक 'मोठे' आहेत. राजकारणी, सेलिब्रिटी, उद्योगपती आहेत. एपिस्टिनच्या फाईल्समध्ये ज्या नावांचा उल्लेख आहे, ते जगभरातील अत्यंत प्रभावशाली, व्हाईट कॉलर लोक आहेत. श्रीमंती आली की विलास आलाच. पण हा विलास जेव्हा शोषण बनतो, तेव्हा त्या माणसाची खरी वृत्ती समोर येते. सोशल मीडियावर आणखी एक भयानक दावा करण्यात आला आहे, नरमांसभक्षणाचा... हा आरोप सिद्ध करणारा ठोस पुरावा सापडला नाही. पण वेश्याव्यवसाय, बलात्कार, बाल लैंगिक गुन्हेगारी, मानवी तस्करी या सर्व गोष्टी सिद्ध झाल्या आहेत. बरं, या गोष्टी एपिस्टिनसारख्या गुन्हेगाराने केल्या असत्या तरी समजू शकतो. पण त्याच्या गुन्हेगारीत अनेक तथाकथित सज्जन व पांढरपेशी लोक सामील आहेत. ''जे का रंजले गांजले, त्यांसि म्हणे जो आपुले. तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा'' ही शिकवण आपल्याला आपल्या संतांनी दिली आहे. आपल्याकडचे अनेक लोक पाश्चात्त्य जगताकडे बोट दाखवून पाश्चात्त्य जग भारतापेक्षा किती पुढारलेलं आहे असं दाखवतात. एपिस्टिन फाईल्सने त्या सर्व अतिउत्साही, भारतद्वेषी लोकांच्या कानाखाली सणकन जाळ काढलाय. आता जे तथ्य समोर येतेय त्यावरून या लोकांना माणूस तर म्हणता येतंच नाही, पण जनावरही का म्हणावं? शेवटी आपण अशा जगात राहतोय जिथे माणसाच्या वेशात वावरणारे राक्षस आहेत. हे राक्षस कधी कोणाच्या नरडीचा घोट घेतील सांगता येत नाही. पण कथेच्या शेवटी, राम रावणाचा वध करतो, या आशेवर जग तारलंय...


writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# मराठी चित्रपटांनाही ओटीटीचा पडदा!

हिंदी पाठोपाठ आता मराठी चित्रपट निर्मात्यांनी देखील ओटीटी या समाजमाध्यमावर चित्रपट प्रदर्शित करण्याचा विचार केलेला दिसत आहे. ६ फेब्रुवारी रोजी 'आता वेळ झाली', हा मराठी चित्रपट अल्ट्रा झकास या ओटीटीवर प्रदर्शित झाला आहे. २०-२५ वर्षांपूर्वी अमरावती, नागपूर, अकोला या विदर्भातील शहरांमध्ये मोठ्या संख्येत चित्रपटगृहे होती. अकोल्यात एकेकाळी १० चित्रपटगृहे होती. आज पाच ते ६ चित्रपटगृहे सुरू आहेत. दूरदर्शनवर आठवड्यातून दोन दिवसच चित्रपट दाखविले जात होते. तेही जुने असायचे. त्यामुळे चित्रपटगृहांत सिनेमा लागला की, पहिल्या दिवशी पहिला शो पाहण्याची क्रेझ होती. तिकीट मिळविणे हा देखील मोठा अभिमानाचा विषय समजला जात होता. एखादा चित्रपट हिट झाला तर, तो कमीत कमी महिनाभर त्या चित्रपटगृहांतून उतरत नव्हता. शेगाव, काटेल कोलद, डव्हा, बहिरम, लोणी इत्यादी तीर्थक्षेत्रांच्या यात्रेत टुरिंग टॉकीज मोठ्या संख्येत येत होत्या. या चित्रपटगृहात निर्माते त्यांचे चित्रपट प्रदर्शित करण्याला प्राधान्य देत होते. मात्र, दादा कोंडकेंच्या मराठी चित्रपटांशिवाय इतर मराठी सिनेमांना रसिकांकडून तेवढा प्रतिसाद मिळत नव्हता. मात्र, मोबाईल आले. सुरुवातीला मोबाईलने दूरध्वनी संचाची जागा घेतली. टेक्स मॅसेज पाठविण्यासाठी त्याचा उपयोग होऊ लागला. त्यात क्रांती झाल्यावर आज प्रत्येकाच्या हाती ॲन्ड्रॉईड मोबाईल आहे.



त्यावरून विविध प्रकारचे चॅनल्स सुरू झाले. चित्रपट देखील त्यावर डाऊनलोड करून बघता येतात. दूरचित्रवाणीवरूनही नव्याने प्रदर्शित झालेले चित्रपट काही दिवसांतच दाखविले जात आहेत. त्यामुळे चित्रपटगृहांत जाऊन चित्रपट पाहणे कमी झाले. प्रेक्षकांची संख्या कमी झाल्याने अनेक चित्रपटगृहे बंद पडली. चित्रपटगृहांच्या जागेवर मॉल किंवा व्यापारी संकुल उभारले जात आहेत. मल्टिफ्लेक्स उभारण्यात आले. पूर्वी चित्रपटांच्या रिळ तयार केल्या जात होत्या. आता सॅटेलाईटद्वारे थेट चित्रपटगृहांत चित्रपट दाखविले जात आहेत. या तंत्रज्ञानाच्या उपयोगामुळे चित्रपट प्रदर्शनाचा खर्च कमी झाला असला तरी, तिकिटांचे दर वाढले आहेत. पत्नीला चित्रपट पाहण्यासाठी घेऊन जायचे तर, किमान एक हजार रुपये लागतात. युवक-युवती तर मोबाईलवर नवीन चित्रपट डाऊनलोड करून बघतात. त्यामुळे चित्रपटगृहांत जाऊन सिनेमा पाहणे टाळले जाते. इत्यादी कारणे निर्माते त्यांचे चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित करण्याची असू शकतात. त्याचबरोबर मराठी चित्रपट निर्मात्यांना चित्रपटगृहात सिनेमा प्रदर्शित करणे त्यांच्या बजेटमध्ये बसत नसावे. तसेही, मराठी चित्रपटांना चित्रपटगृहे मिळत नाहीत, अशी निर्माते, कलावंतांची ओरड असते. त्याचप्रमाणे ओटीटीवर चित्रपट प्रदर्शित केल्यास तो करोडो प्रेक्षकांपर्यंत जातो. हा देखील फायदा या माध्यमांचा होत असलेला पाहूनही मराठी चित्रपट निर्माते या माध्यमावर आपला चित्रपट प्रदर्शित करण्याकडे वळले असावेत. मराठी चित्रपट निर्मितीला महाराष्ट्र सरकार अनुदान देखील देते. मराठी चित्रपटांना प्रोत्साहन मिळावे, हा त्यामागे उद्देश आहे. पण, काही निर्माते टुकार चित्रपट काढून केवळ शासकीय अनुदान लाटण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे शासनाचा अनुदान देण्यामागचा उद्देश सफल होताना दिसत नाही. चित्रपटापासून शासनाला करमणूक कराच्या माध्यमातून उत्पन्न मिळते. मात्र, सिनेमा निर्मितीचा उद्देश केवळ अनुदान मिळविणे एवढाच असेल तर, चित्रपट देखील दर्जाहीन केला जातो. त्यामुळे शासनाचा उद्देश सफल होत नाही. तेव्हा, प्रेक्षक पुन्हा चित्रपटगृहात आले पाहिजे यासाठी दर्जेदार मराठी चित्रपट तयार होणे अत्यंत आवश्यक आहे. निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, अभिनेत्री सोबतच चित्रपटाशी संबंधित सर्व कलाकार व पडद्यामागील तंत्रज्ञांनी ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे. राज कपूर, राजकुमार, अमिताभ बच्चन, दिलीपकुमार, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन पिळगावकर, अशोक सराफ यांचा अभिनय असलेले चित्रपट आजही रसिकांचे आकर्षण आहेत. आजही दर्जेदार सिनेमा असेल तर, रसिक कितीही पैसे खर्च करून, कितीही दूर असलेल्या चित्रपटगृहात पाहण्यासाठी जातात. नुकताच धुरंधर हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाने प्रचंड व्यवसाय केला. या चित्रपटाचे गारुड रसिकांच्या मनावर कायम आहे. अनेक जण त्यामध्ये अक्षय खन्नाच्या गाण्यावर रिल करीत आहेत. ओटीटीवर चित्रपट प्रदर्शित झाल्याने तो एकाचवेळी देश आणि विदेशात कमी खर्चात पाहिला जातो. हा फायदा जरी असला तरी, रसिकांनी चित्रपटगृहात जाऊन तो पाहावा, अशी निर्मिती होणे आवश्यक आहे.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

# पवारांचा नवा जावईशोध!

**नागेश दाचेवार**

राजकारणात बोलण्याचा अधिकार नेमका कुणाला असतो, हा प्रश्न सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात नव्याने अवतरला आहे. विलीनीकरणाच्या चर्चेत देवेंद्र फडणवीस उपस्थित नव्हते, त्यामुळे त्यांना या विषयावर बोलण्याचा काय अधिकार?, असा सवाल ज्येष्ठ नेते शरद पवारांनी उपस्थित केला. ऐकायला हा सवाल अत्यंत तर्कशुद्ध, नैतिकतेचा झेंडा फडकावणारा वाटतो, पण जरा खोलात डोकावून पाहिलं, तर लक्षात येतं की हा तर्क सार्वत्रिक नसून तो केवळ निवडक लोकांसाठी आणि तेही निव्वळ राजकीय सोयीनुसार वापरला जातो, असे स्पष्टपणे लक्षात येते. कारण महाराष्ट्राच्या राजकारणात जे नेते सर्वाधिक बोलघेवडे म्हणून ओळखले जातात, जे सकाळपासून संध्याकाळपर्यंत प्रत्येक विषयावर, प्रत्येक निर्णयावर, प्रत्येक बैठकीवर आपली ठाम भूमिका मांडत असतात, ते बहुतांशी याच पवारसाहेबांच्या सहवासातले, पक्षातले किंवा राजकीय नातेसंबंधातलेच आहेत. अमेरिकेतील व्हाईट हाऊसपासून ते राज्यातील ग्रामपंचायतीपर्यंत काय चाललंय, हे सांगणारे हेच लोक असतात. तेव्हा कधीच असा प्रश्न उपस्थित होत नाही की तुम्ही त्या बैठकीत होतात का? किंवा तुम्हाला यावर बोलण्याचा अधिकार कुणी दिला? मग असे असताना पवारांनी हा नवा जावईशोध लावलाय् कुठून हा प्रश्न मात्र येथे उपस्थित होतो.

जर तिथे नव्हते म्हणून, त्यावर बोलण्याचा अधिकार नाही किंवा त्या विषयावर बोलू नका हा नियम स्वीकारायचा असेल, तर तो सर्वांनाच लागू व्हायला हवा. पण तसे होताना दिसत नाही. देशात घडणाऱ्या न्यायालयीन निर्णयांपासून ते परराष्ट्र धोरणापर्यंत, राज्यातील प्रशासकीय निर्णयांपासून ते केंद्रातील राजकीय हालचालींपर्यंत अनेक विषयांशी शरद पवार किंवा त्यांच्या गटाचा थेट काय, अप्रत्यक्षही संबंध नसतो. तरीही त्या प्रत्येक विषयावर सुप्रिया सुळे असोत, जयंत पाटील असोत किंवा इतर नेते असोत, एवढंच कशाला दस्तुरखुद्द शरद पवार असोत, रोज माध्यमांसमोर भूमिका मांडतच असतात. तेव्हा तर ही मंडळी जणू काही तेथे उपस्थित असल्याच्या आविर्भावातच बोलतात. त्यावेळी पवारांच्या मनात अरे, आपण तेथे उपस्थित नव्हतो, मग आपल्याला बोलण्याचा अधिकार नाही, असे वाटल्याचे दिसले नाही.

देवेंद्र फडणवीसांनी नेमकं काय म्हटलं होतं, ते पाहणं महत्त्वाचं आहे. त्यांनी कुठेही विलीनीकरणाची बैठक झाली असं ठाम विधान केलं नाही. त्यांनी कुठेही विलीनीकरण होऊ नये असेही म्हटले नाही. उलट राष्ट्रवादी काँग्रेस हा एक स्वतंत्र राजकीय पक्ष असून, त्यांना त्यांचे निर्णय घेण्याचा अधिकार आहे. त्यांनी घेतलेल्या निर्णयाला आमचा पाठिंबाच असेल. फडणवीसांनी एक सरळ, थेट आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. अजित पवार दोन-तीन वर्षांपासून आमच्यासोबत सत्तेत आहेत, महायुतीत निवडून आले आहेत, राष्ट्रवादीच्या त्यांच्या गटाचा प्रचार शिवसेना-भाजपाने केला आहे. मग अजित पवार आम्हाला न सांगता विलीनीकरण करून सत्तेतून बाहेर पडणार होते का? हा प्रश्न तथ्यांवर आधारित आहे, कल्पनांवर नाही. अजित पवारांचा राष्ट्रवादी पक्ष हा आज सत्तेचा भाग आहे, हे कोणीही नाकारू शकत नाही. त्यांच्या गटाने महायुतीसोबत निवडणूक लढवली, हेही वास्तव आहे. त्यामुळे राष्ट्रवादी पक्ष जर अन्य दुसऱ्या पक्षात विलीन होण्याच्या विचारात असेल तर, अजित पवारांनी सत्तेतील पक्षांना अंधारात ठेवले नसते. याची कल्पना दिली असती. एवढा सोपा सरळ तर्क फडणवीसांनी सांगितला. आणि राजकीय चष्म्यातून बघितले तर, फडणवीसांनी बोललेलं अत्यंत तर्कशुद्ध आहे.



या प्रश्नाचा मथितार्थ फारच साधा आहे. एकतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार मग अजित पवार सत्तेतून बाहेर पडणार होते किंवा शरद पवार महाविकास आघाडीतून बाहेर पडणार होते. याशिवाय तिसरा पर्याय होता तरी कोणता? मात्र या प्रश्नांचं उत्तर देण्याऐवजी, तिथे नव्हते म्हणून फडणवीसांना बोलण्याचा अधिकार नाही असा मुद्दा पुढे केला जातो. हा मुद्दा प्रत्यक्ष प्रश्नाला बगल देणारा नाही का? अजित पवारांचं सोडा, आता शरद पवार आहेत ना... मग जे हयात आहेत त्यांच्यासाठी प्रश्न आहेत, विलीनीकरण करून, महाविकास आघाडीतून बाहेर पडून, तुम्ही सत्तेत जाणार होता का? तुम्ही आपल्या मुलीला केंद्रात मंत्री बनविणार होता का? तुम्ही स्वतः पुन्हा राज्यसभेवर जाण्याचे गणित जुळवत होता का? शरद पवारांनी आधी या प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्राला द्यावी. या प्रश्नांच्या उत्तरांपुढे मग फडणवीसांनी या विषयावर बोलावे की नाही हा दुय्यम विषय ठरतो.


इथेच राजकीय दुहेरी निकष ठळकपणे दिसतात. कारण हाच निकष जर लावायचा असेल, तर संजय राऊत या चर्चेत कुठे होते, हेही विचारावं लागेल. बैठकीचा व्हिडीओ पाहिल्यावर राऊत कुठेही दिसत नाहीत. तरीही ते रोज या विषयावर आपला भोंगा वाजवताना दिसत आहेत. इतकंच नाही, तर व्हाईट हाऊसमध्ये काय चाललंय, यापासून ते देशाच्या अंतर्गत सुरक्षेपर्यंत, राऊत दररोज माहिती देत असतात. तेव्हा शरद पवारांनी कधी असं म्हटलं का की राऊत तुम्ही तिथे नव्हता, त्यामुळे तुम्हाला बोलण्याचा अधिकार नाही. पवारांनी राऊतांना का बजावलं नाही? कारण राऊत हे तुमचे मानसपुत्र म्हणून ओळखले जातात, म्हणून त्यांच्यासाठी वेगळा नियम? की त्यांच्या वक्तव्यांचा उपयोग विशिष्ट राजकीय अजेंडा पुढे नेण्यासाठी होतो, म्हणून त्यांना मोकळीक? जर बैठकीत उपस्थित नसणं हा बोलण्याचा निकष असेल, तर हा नियम अचानक देवेंद्र फडणवीसांपुरताच का? सर्वांवर लागू व्हायला हवा ना. अन्यथा हा निकष नाही, तर निव्वळ राजकीय सोयीने घेतलेली वेळमारू भूमिका होय, असे म्हणायला हरकत नाही. कारण शरद पवार स्वत: केंद्र सरकार किंवा राज्य सरकार यांच्या निर्णयांवर प्रत्यक्ष त्या बैठकीत उपस्थित नसताना देखील खुल्लम खुल्ला वक्तव्यं, टीका आणि भूमिका मांडत बोलत आल्याची अनेक उदाहरणं आहेत. खरं तर देवेंद्र फडणवीसांचा सवाल हा राजकीय शिष्टाचाराचा नाही, तर सत्तेतील स्थैर्याचा आहे. अजित पवारांसारखा महत्त्वाचा घटक जर कोणतीही चर्चा न करता वेगळा निर्णय घेणार असेल, तर सत्तेत असलेल्या सहकाऱ्यांना प्रश्न विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे. हे लोकशाहीत गैर नाही, तर आवश्यक आहे. पण फडणवीसांनी केलेल्या दाव्याला उत्तर देण्याऐवजी, वैयक्तिक पातळीवर ते तिथे नव्हते त्यामुळे त्यांना बोलण्याचा अधिकार नाही, असे म्हणून, मूळ मुद्याला टाळण्याचा, बगल देण्याचा प्रयत्न नाही तर दुसरं काय म्हणायचं याला? शेवटी एकच प्रश्न उरतो, जर बोलण्याचा अधिकार फक्त बैठकीत उपस्थित असलेल्यांनाच असेल, तर महाराष्ट्राच्या राजकारणात दररोज जे बोलणारे आहेत, त्यातले निम्मे लोक गप्प बसायला हवेत. सकाळचा ९ चा भोंगा बंद व्हायला हवा. किंबहुना शरद पवारांना अलिकडेच उपस्थित असलेल्यांनीच बोलावे अशी उपरती आली असल्याने, त्यांनी आता इथून पुढे हा भोंगा थांबवायला हरकत नाही. पण तसं होणार नाही. कारण हा नियम तत्त्वाचा नाही, तर सोयीचा आहे. आणि सोयीचं राजकारण किती काळ टिकतं, हे महाराष्ट्राने अनेकदा पाहिलं आहे. तरीदेखील साहेबांचा शब्द हा महत्त्वाचा असतो, त्यामुळे प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी आता यापुढे कोणत्याही पत्रकार परिषदेची सुरुवात आपण तेथे उपस्थित होता का? या प्रश्नाने केली पाहिजे. आणि नसल्यास आपल्याला बोलण्याचा अधिकार नाही, असे ठामपणे बजावून सांगितले पाहिजे.

९२७०३३३८८६

### नळगंगा-वैनगंगा प्रकल्पात गोसीखुर्दचे पाणी

वैनगंगा नदीवरील गोसीखुर्द (इंदिरासागर) राष्ट्रीय प्रकल्पातून तापी उपखोऱ्यामधील नळगंगा नदीवरील प्रकल्पात सुमारे १८०४ दलघमी पाणी वळविण्यात येणार आहे. त्यामुळे विदर्भातील भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशीम व बुलढाणा या ८ जिल्ह्यांमध्ये सुमारे ४ लाख ४ हजार २८१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणता येणार आहे. याशिवाय, औद्योगिक तसेच घरगुती पाणी वापराच्या सुविधाही मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहेत. या प्रकल्पाचे काम वर्षभरात सुरू होणार आहे.

या प्रकल्पास २०२४ मध्ये राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे. सुमारे ९४ हजार ९१२ कोटी रुपये किमतीचा प्रकल्प अहवाल मे. सिएन्सिस टेक लिमिटेड या कंपनीने तयार केला असून तो शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविला आहे. उपरोक्त प्रकल्प फार महत्त्वाकांक्षी आहे, असे जाणवते. गोसीखुर्द प्रकल्पासाठी १९८४ मध्ये ४८४ कोटींची प्रशासकीय मान्यता मिळाली होती. गोसीखुर्द प्रकल्पामुळे २.५ लक्ष हेक्टर



जमीन सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पाची आजची सुधारित किंमत जवळपास २० हजार कोटी रुपये झाली आहे. गोसीखुर्द प्रकल्पाच्या कामाला जवळपास ४० वर्षे पूर्ण होऊनही अद्याप पूर्ण २.५ लाख हेक्टर जमिनीचे सिंचन होऊ शकलेले नाही. नळगंगा वैनगंगा प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळणे अगोदर गोसीखुर्द प्रकल्पाची मूळ किंमत, काम पूर्ण होण्यास लागलेला कालावधी व त्याची सुधारित किंमत याची तुलना नळगंगा वैनगंगा प्रकल्पाची आजची किंमत, प्रकल्प पूर्ण होण्यास लागणारा कालावधी व प्रकल्पाची सुधारित किंमत याची तुलना करणे आवश्यक वाटते. नळगंगा वैनगंगा प्रकल्प पुढच्या वर्षी सुरू होणार असे म्हटले आहे. या प्रकल्पाला शासनाची प्रशासकीय मान्यता मिळण्या अगोदर ४ लाख ४ हजार २८१ जमीन सिंचनाखाली आणण्याकरता काही मध्यम व लघु प्रकल्प हाती घेतल्यास, कमी किमतीत, कमी कालावधीत विदर्भाचे सिंचन क्षेत्र वाढू शकते का याचा अभ्यास होणे जरुरी आहे. उपरोक्त आकडेवारीवरून मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प हे आर्थिकदृष्ट्या जास्त फायदेशीर ठरतील असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

## वाचक पत्रे

### पाकिस्तानातील लोकशाही दुर्बलच

भारताचे शेजारी राष्ट्र असलेल्या पाकिस्तानमध्ये सध्या सुरू असलेल्या घडामोडी तेथील उरलीसुरली लोकशाही संपवून टाकण्याच्या हालचाली असल्याचे दर्शवीत आहेत. अलिकडेच झालेल्या घटना दुरुस्तीमुळे तेथील लष्करशाही आणखी मजबूत आणि मुजोर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी त्यांना ज्यांच्या मेहरबानीमुळे हे पद प्राप्त झाले त्यांची चांगलीच परतफेड चालवली आहे. आधीच मर्यादित असलेली तेथील लोकशाही आणखीनच संकुचित होताना दिसत आहे. यामध्ये पाकिस्तानी संसदही लोकशाहीला संपवण्याच्या मोहिमेत सहभागी असल्याचे चित्र आहे. अलिकडेच झालेल्या सत्ताविसाव्या घटना दुरुस्तीमध्ये जनरल असीम मुनीर यांना बरेच अधिकार प्राप्त होणार आहेत. मागे अशाच घटना दुरुस्तीच्या निर्णयाचा विरोध करण्यासाठी पाकिस्तानातील लोकशाहीवादी जनता रस्त्यावर उतरली होती. आताही तशीच शक्यता व्यक्त केली जात आहे. पाकिस्तानी राजकीय नेते कायम लष्कराच्या हातचे बाहुले होत आले आहेत. अजूनही त्यात फारसा फरक पडावयास तयार नाही. अमेरिकेसारख्या युद्धखोर राष्ट्राकडून कायम आर्थिक मदत घेण्याकडे पाकिस्तानचा कल राहिला आहे. आता चीनकडूनही पाकिस्तानचे नेते आपली झोळी भरून घेताना दिसत आहे.

चीन आणि अमेरिकेसारखे देश दिलेल्या मदतीची पुरेपूर वसुली करीत असतात. अशा स्थितीत पाकिस्तानमधील लोकशाही अधिकाधिक दुर्बल करण्याच्या प्रयत्नांत तेथील लष्कराची हुजरेगिरी करणारे सत्ताधारी नेते आहेत. पाकिस्तानी सरकारकडून कधीही लोकाभिमुख योजना राबवली गेल्याचे ऐकिवात नाही. सर्वसामान्य नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर तेथील राजकारणी कधीही गंभीर असल्याचे जाणवले नाही. प्रगत राष्ट्रांकडून मिळालेल्या अब्जावधी रुपयांच्या मदत निधीचा वापर दहशतवाद पोसण्यासाठीच होत आला आहे. पाकिस्तानने त्याऐवजी जनहिताकडे लक्ष दिल्यास त्यांना वारंवार मदतीची याचना करण्याची वेळ येणार नाही. परंतु, ऐशोआराम आणि चंगळवादी आयुष्याची सवय जडलेल्या शाहबाज सरकारला लोकशाहीची मान लष्कररूपी कसायाच्या हाती सोपवण्याची घाई झाल्याचे स्पष्ट होते.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दि.१९ रोजी असून आता जयंतीच्या पार्श्वभूमीवर शिवरायांच्या सुबक मूर्ती तयार केल्या जात आहेत. बाह्यवळण रस्ता चौकात मूर्ती तयार करुन त्याच्यावर रंगाचा हात फिरविताना कलावंत (छाया : कृष्णा शिंदे)

## ना.पंकजाताईंचे माध्यमातुन होणारा महापशुधन एक्स्पो मेळावा बीडच्या शेतकऱ्यांसाठी नवसंजीवनी-शंकर देशमुख

### मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी सहभागी होण्याचे ही आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ फेब्रुवारी**

पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी परळी येथे दि.१३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी पर्यंत महापशुधन एक्स्पो मेळावा घेऊन बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना व पशुपालकांना आर्थिक विकासासाठी नवसंजीवनी निर्माण करुन दिली आहे शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे



बीड जिल्ह्यातील परळी येथे दि.१३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी यादरम्यान पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या विभागाद्वारे महापशुधन एक्स्पो हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.ना.पंकजाताई मुंडे यांनी सशक्त पशुधन बीड जिल्ह्यातील व राज्यातील शेतकरी पशुपालकांना नवनवीन पशुधनाची व त्यांच्या निगराणीविषयी तसेच या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी या करिता हे महापशुधन एक्स्पोचे आयोजन केले आहे या प्रदर्शनात १५०० विविध जातीचे पशु प्रदर्शित करण्यात येणार आहेत त्यशिवाय शासनाच्या कृषी महिला व बालविकास विभागामार्फत विविध माहितीपर स्टॉल लावण्यात येणार आहेत बचतगट यांचे ही स्टॅल असून विविध जातीचे पशु डॉग शोसह प्राण्यांसाठी ४० प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत या विजेत्यांना पारितोषिक देण्यात येतील शेतकरी पशुपालकांना विविध तज्ञांकडुन मार्गदर्शन होणार आहे या प्रदर्शनाने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे या परळी येथे होणाऱ्या महापशुधन एक्स्पो प्रदर्शनात शेतकऱ्यांना व पशुपालकांनी सहभागी होऊन लाभ घ्यावा असे आवाहन शंकर देशमुख यांनी केले आहे

## वंजारवाडी तलाव आणि पाट दुरूस्तीच्या कामाला १ कोटी ७ लाखांचा निधी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ फेब्रुवारी**

वंजारवाडी लघु प्रकल्प तलाव दुरूस्ती आणि पाट दुरूस्तीच्या कामासाठी जलसंपदा विभागाकडून १ कोटी ७ लाखांच्या निधीसह मंजुरी देण्यात आली आहे. सदरील काम हे निविदास्तरावर असून लवकरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात होणार आहे. यामुळे राजुरी परिसरातील ८ ते १० गावांच्या शेतीसिंचनाचा प्रश्न कायमचा मार्गी लागणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून हा मोठा प्रश्न मार्गी लागला आहे.

बीड तालुक्यातील वंजारवाडी लघू प्रकल्प असलेला तलावाचे काम सन १९६५ मध्ये पूर्ण झाले आहे. या प्रकल्पाची सिंचन क्षमता ही १०५२ हेक्टर आहे. तलाव म्हणजे राजूरी परिसरातील ८ ते १० गावांना शेती सिंचनासाठी पूरक ठरू शकणारा स्त्रोत आहे. परंतु सदरील तलावाचे काम मोठ्या कालवधीपूर्वी झाल्यामुळे याठिकाणी मुख्य बांधकाम कमकुवत होणे, त्यातून पाण्याची गळती होणे, सांडव्याची दुभाजक भिंत मोडकळीस आली होती. त्यामुळे येथे आवश्यक ती दुरूस्तीची कामे होणे अत्यंत गरजेचे होते. ही बाब लक्षात घेऊन राजूरी परिसरातील शेतकरी बांधवांनी आदर्श गाव वंजारवाडीचे सरपंच वैजनाथ तांदळे यांच्या माध्यमातून हा प्रश्न आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे मांडला. त्यावर आ.क्षीरसागर यांनी या संदर्भात शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. परिणामी वंजारवाडी तलाव आणि पाटदुरूस्तीच्या कामासाठी १ कोटी ७ लाख रूपयांचा भरघोस निधीसह मंजूरी मिळाली आहे.आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. त्यामुळे राजूरी, वंजारवाडी आणि परिसरातील गावांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

डोमरी तलावाचे पाणी वंजारवाडी तलावात आणण्यासाठीही पाठपुरावा सुरू, स्व.अजितदादांनीही दिले होते निर्देश

मागील अनेक वर्षांपासून डोमरी तलावामध्ये अतिरिक्त असलेले पाणी वंजारवाडी तलावात वळविण्यासाठी मागणी आहे. आ.संदीप क्षीरसागर हे मागील अनेक दिवसांपासून डोमरी तलावातील अतिरिक्त (ओव्हरफ्लो) पाणी वंजारवाडी तलावात लिफ्टींगद्वारे आणण्यासाठी आणि वंजारवाडी धरणाची उंची वाढवण्यासाठी शासन आणि प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. दरम्यान सन २००७ मध्ये स्व.अजित दादा पवार जलसंपदा मंत्री असताना, डोमरी धरणातील अतिरिक्त पाणी वंजारवाडी धरणात वळवणे आणि वंजारवाडी तलावाची उंची वाढविण्याचा कामासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते.

## ध्रुव गट ब मधील विद्यार्थ्यांची लोटस रुग्णालयाला क्षेत्रभेट संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ फेब्रुवारी**



दीनदयाल शोध संस्थान संचलित, नानाजी देशमुख विद्यामंदिर ,गोकुळ शिशू वाटिका बीड, येथील ध्रुव गट 'ब' मधील विद्यार्थ्यांची नाट्यगृह शेजारी लोटस रुग्णालयाला भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या मनात सेवाभाव रुजावा यासाठी एक छोटासा प्रयत्न . स्वातीताई देशपांडे व क्रांतीताई पोरवाल यांच्या समवेत १८ विद्यार्थी रुग्णालयामध्ये गेले त्यानंतर त्यांनी सर्वप्रथम निरीक्षण केले. डॉक्टरांशी संवाद साधला. डॉक्टरांना विविध प्रश्न विचारले. त्यामध्ये डॉ. आशिष गर्जे, डॉ.अमित काळे, डॉ.शेळके सर, डॉ. पूजा काळे, डॉ.सायली शेळके, डॉ.अजित काळे, डॉ.श्वेता चौधरी, डॉ. प्रतिभा नीरकर व ३० नर्सिंग स्टाफ इत्यादी लोटस दवाखान्यामध्ये रुग्णांची निस्वार्थीपणे सेवा करतात. विद्यार्थ्यांनी रुग्णांची भेट घेतली त्यांच्याशी देखील संवाद साधला. सर्व डॉक्टर लोकांनी विद्यार्थ्यांना खूप छान माहिती सांगितली तसेच दवाखान्यातील विविध मशीन, जसे की त्यामध्ये एक्स-रे, ईसीजी मशीन, बीपी मशीन, इंजेक्शन, यांची प्राथमिक माहिती सांगितली. रुग्णांची सेवा कशा प्रकारे केली जाते तसेच का करावी? हे विद्यार्थ्यांना सांगितले. अशाप्रकारे क्षेत्रभेट संपन्न झाली. अशा नवनवीन कल्पनांना मा.डॉ. सीमाताई जोशी, मा.ऍड.अर्चना ताई तुंगार, मा.गंगाधर देशमुख सर, मा.श्रीमती. सुनंदाताई कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. व क्षेत्रभेट सर्वांच्या सहकार्याने व्यवस्थित रित्या संपन्न झाली.

## भाषा माणसाला समृद्ध बनवते -डॉ सुधाकर शेंडगे

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.७ फेब्रुवारी**



शिक्षण म्हणजे ज्ञान आत्मसात करणे होय. भाषा बोलण्याचे एक कौशल्य असते. श्रवण, संभाषण (संवाद), वाचन , लेखन यातुन भाषा कौशल्य साध्य होते.भाषा माणसाला समृद्ध बनवते असे प्रतिपादन सुंदराराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्यावतीने दोन दिवसीय शिबिरात बोलताना डॉ. सुधाकर शेंडगे यांनी व्यक्त केले.

सुंदराराव सोळंके महाविद्यालयात दि ५ व ६ फेब्रुवारी रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ सुधाकर शेंडगे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ.एम. ए. कव्हळे होते.यावेळी समन्वयक डॉ बालाजी बोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ सुधाकर शेंडगे म्हणाले की, स्वतःच्या पायावर उभाराने हीच शिक्षणाचे खरी यशस्वीता आहे. पुस्तकाच्या पलीकडचे जीवन आपल्याला समजले पाहिजे.

अध्यक्षीय समारोप डॉ.एम.ए.कव्हळे यांनी आजीवन शिक्षण व विस्तार याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. बालाजी बोडके यांनी केले. सूत्रसंचालन डॉ गणेश मोकासरे यांनी केले तर आभार डॉ बिलास काळे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी -विद्यार्थिनी , प्राध्यापक यांची उपस्थिती.

# मराठवाडा श्रीरामाच्या पदस्पर्शाची पुण्यभूमी

## इतिहास आणि पुराण विसरलो की भविष्य अंधारात : ह भ. प. विशाल महाराज रामदासी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ फेब्रुवारी**

ऋषी परंपरा म्हणजे ते वैज्ञानिक होते, ते ध्येयवेडे होते, शरीर रचने कडे त्याचं दुर्लक्ष होतं ,एकाच रंगाचे वस्त्र ते परिधान करत , केसांच्या जटा सावरण्यात-आवरण्यात वेळ जाऊ नये म्हणून ठेवत. साधनेने, तपातून शोध लावणारे ऋषीची परंपरा आहे. जे पीक काही तासात उत्पादन करून ते खात असत, असे कृषी सह अनेक शोध ऋषींनी हजारो वर्षांपूर्वीच सिद्ध केलेले आहेत. आज जे विज्ञानाचे शोध म्हणतो ते सर्व वेदांमध्ये आहेत. पुराण चा अभ्यास आणि इतिहासाची आठवण करत ते ऐकणे, समजून घेणे झाले नाही तर भविष्य अंधारात जाईल .

आपण मराठवाड्यातील लोक पुण्यवान आहोत. गौतम ऋषीच्या कृपेने गोदावरी माता आपल्याला प्राप्त झाली ,जिच्या सानिध्यात मोठा काळ प्रभुराम राहिलेले आहेत ,अशा पुण्यक्षेत्री आपणही राहत आहोत.

प्रभू श्रीरामाच्या जन्म कथाभागाच्या पुढं आज अल्पकाळात शिक्षण आणि विविध कला त्यांनी अवगत केल्या., 'मला चंद्र पाहिजे' लक्ष्मणाने बालहट्ट केला, मातेने मोठ्या परातीत पाणी ठेवून त्यात चंद्राचे प्रतिबिंब दाखवले, त्याच वेळी राम देखील पाहत होते चंद्र आणि राम ते प्रतिबिंब आणि हे जवळ असलेले बिंब, रामा चे मुख सारखेच लक्ष्मणाला वाटलं म्हणून तेव्हापासून रामचंद्र असेही म्हटले जाते. राम-लक्ष्मण-भरत -शत्रुघ्न चारही बंधूचे प्रेम, सोबतच विवाह हा कथाभाग , रामराज्य त्यांच्या जन्मापासूनच सुरू झालं होतं .देव बालपणी रडला तो माता कौशल्याच्या आनंदासाठी ,हितासाठी तेथूनच हितकारी रामराज्याची खरी सुरुवात आहे.त्यानंतर विश्वामित्र ऋषींनी 'एक तुझा पुत्र दे दशरथा अशी मागणी करून यज्ञ कार्यासाठी क्षात्रधर्मपालन, जनकराजाची, शिवधनुष्याची महती , माता अहिल्यांची कथा, दृष्टांचा नाश करणारे भगवान परशुराम यांचे धावते वर्णन सांगत सीता स्वयंवराचा प्रसंग खूप रंजकतेने हा अयोध्येतील हा नयनरम्य देवतांचा विवाह सोहळा साक्षात आज विशाल महाराजांनी डोळ्यासमोर आपल्या वाणीतून प्रगट केला.




इतिहास ,वेद आणि पुराण ग्रंथातील भावार्थ लक्षात येण्यासाठी त्यातील शब्दांचा वर्ण, अर्थ, छंद ,सर्व व्याकरण अभ्यासून घेतला पाहिजे, नाहीतर अनर्थ होतो, तसा अनर्थ तुलशीदासांच्या एका चौपाईचा झालेला, धर्मप्राण उपाधी असलेले काशी क्षेत्रातील पुण्य पुरुष द्रविडशास्त्रींनी विशद केला समजावून दिला ही संत महात्म्याची पुण्याई सांगितली.आज नंदकुमार महाराज रामदासी यांच्या एकसष्ठी निमित्ताने बीड येथील कपिल मुनी मंदिर येथे होत असलेल्या राम कथे प्रसंगी सतीशजी डाके, बाळासाहेब थिगळे,वझुरकर, डॉ.अनुराग पांगरीकर, श्रवण थिगळे,हभप प्रज्ञाताई रामदासी, डॉ.यु डी कुलकर्णी,वे.मू.अतुलभट्ट सीतापती, ,कामधेनू चे श्रीनिवास कुलकर्णी,रामराजे राक्षसभुवनकर, उत्तम साथसंगत प्रकाश मानूरकर, सखाराम मुळे यांची लाभतं खूप सुंदर मधुर रंजक कथा श्रवणात श्रोते रंगले होते.

आज सांगता

रविवार ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता राम कथेची सांगता, तद्नंतर मान्यवरांच्या उपस्थितीत श्री नंदकुमार महाराजांची तुला, श्री कृष्णा महाराज रामदासी यांचे काल्याचे किर्तन ११ वाजता आणि महाप्रसाद दुपारी एक पासून होणार असून याप्रसंगी उपस्थित राहून सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन मार्गदर्शक मंडळातील श्री विनायक महाराज पाटंगणकर आणि रामदासी शिष्य परिवाराच्या वतीने करण्यात येत आहे

## घळाटवाडीच्या पठाडे दाम्पत्यास आदर्श माता - पिता पुरस्कार

### आर्थिक परिस्थितीशी दोन हात करत दोन्ही मुलांना केले मृदंगविशारद गेवराईच्या सत्संग किर्तन महोत्सवात झाला सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.७ फेब्रुवारी**

तालुक्यातील घळाटवाडी येथील प्रगतशील शेतकरी असलेले जोतिराम साहेबराव पठाडे व सौ. उर्मिला जोतिराम पठाडे या दाम्पत्याने आर्थिक परिस्थितीशी दोन हात करून मोठा मुलगा भरत व शत्रुघ्न या दोन मुलांना पं. केशव जगदाळे गुरूजी यांच्या मार्गदर्शनाखाली मृदंगाचे शिक्षण देत मृदंगविशारद केले. याबद्दल त्यांचा सन्मान करत गेवराई येथे नुकत्याच पार पडलेल्या सत्संग किर्तन महोत्सवात सुप्रसिध्द महाराज मंडळींच्या हस्ते आदर्श माता - पिता पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शहरापासुन अवघ्या पाच ते सहा किलोमिटर अंतरावर असलेल्या घळाटवाडी येथील जोतिराम पठाडे हे शेतकरी कुटूंबातील. सुरूवातीच्या काळात त्यांना देखिल मोठ्या संघर्षाचा सामना करावा लागला. दोन वेळेच्या जेवणावर त्यांनी दुस-याकडे नौकरी केली



परंतु मुलांना उच्चसुशिक्षीत करण्याची जिद्द त्यांना व त्यांच्या पत्नीला स्वस्त बसु देत नव्हती. परंतु आर्थिक परिस्थितीमुळे मात्र त्यांना मुलांना शिक्षण देणे जिकीरीचे ठरत होते. त्यामुळे त्यांनी शेतीला जोडधंदा म्हणुन सायकलवरून दुग्धव्यवसाय, फुलशेती असे वेगवेगळे प्रयोग करत पैशांची जमवाजमव केली आणि निर्णय घेत मोठा मुलगा भरत महाराज पठाडे यास वयाच्या तिस-या वर्षापासुन पं. केशव जगदाळे गुरूजी यांचेकडे मृदगांचे धडे घेण्यास पाठविले. बालपणापासुनच मृदंगाचे शिक्षण आणि आवड असल्याने भरत याने मोठा नावलौकीक सांप्रदायिक क्षेत्रात मिळविला तर छोटा मुलगा शत्रुघ्न याने देखिल भरतच्या हातावर हात मारत दोन्ही पठाडे बांधवांनी आज स्वतःचे, त्यांच्या आई वडील, गुरूवर्य पं. केशव जगदाळे गुरूजी व गावाचा महाराष्ट्रभर नावलौकीक मिळविला असुन महाराष्ट्रातील असे एक गाव नाही ज्या गावात भरत - शत्रुघ्न माहित नाहीत अशी परिस्थिती सध्या आहे. त्यामुळे या दोघा भावांचे रोजच सत्कार, सन्मान होतात. परंतु गेवराई येथे या दोघा भावंडांना घडविणा-या त्यांचे वडिल जोतिराम पठाडे व आई उर्मिला पठाडे यांचा आदर्श माता - पिता म्हणुन भरत महाराज पठाडे यांच्या उपस्थितीत प्रसिध्द किर्तनकार प्रकाश महाराज साठे, समन्वयक महादेव चाटे, हरिहर महाराज दिवेगावकर, बाळु ताकट, अक्षय भोसले, अतुल महाराज शास्त्री यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. याबद्दल या पठाडे कुटूंबीयांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पांडुरंगाच्या कृपेने व पं. केशव जगदाळे गुरूजींच्या आशिर्वादाने दोन्ही मुलांनी नावलौकीक मिळविला आहे. त्यांचे यश पाहुन अभिमान वाटतो. यापुढेही त्यांचेकडुन अशीच सांप्रदायिक क्षेत्राची सेवा घडत राहो. हा पुरस्कार आम्ही आमच्या मुलांना घडविणा-या पं. केशव जगदाळे गुरूजींच्या चरणी अर्पण करतो. - सौ. उर्मिला जोतिराम पठाडे.

## भागूजीराव ढेकळे विद्यालयात इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.७ फेब्रुवारी**

तालुक्यातील कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा तर इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए.एस. हे होते.



शुक्रवार दि. ६ रोजी कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात घेण्यात आलेल्या निरोप समारंभ कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ह. भ. प. राम महाराज वराट, पाडळसिंगी चे सरपंच रितेश साबळे, उपसरपंच विकास चौधरी, बळीराम नन्नवरे, बळीराम साबळे, लक्ष्मण दाभाडे, बाबासाहेब दाभाडे, रामराव मोहोळकर, दीपक लाटे, विनायक नन्नवरे, राहुल गिरी, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना व्याख्याते राहुल गिरी म्हणाले की, उच्च शिक्षण घेण्यासाठी आणि पुढील दिशा ठरवण्यासाठी ही संधी आहे. या बाबीचे महत्त्व शिक्षक सांगतात ते तुम्हाला कळणे गरजेचे आहे. संधी ही चोर पावलांनी येते आणि जाताना ती वाजत- गाजत जाते असे सांगून विद्यार्थ्यांनी करिअर साठी योग्य क्षेत्र निवडावे असे सांगितले. याशिवाय सिद्धी गव्हाणे, सारिका जाधव, प्रणिता दामोधर, प्रा. अरुण कळाशे, अजिनाथ घुमरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलताना प्राचार्य थिटे सरांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करून इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या यावेळी पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, राजेंद्र सोनवणे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीराम जाधव यांनी केले शेवटी चंद्रशेखर जामकर यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत आजपासून दयानंद श्रीलेले राष्ट्रीय हॉकी स्पर्धेला सुरूवात

## हिंगोली जिल्हा हॉकी असोसिएशनच्यावतीने स्पर्धाचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

गेल्या दहा वर्षानंतर प्रथमच जुन्या जिल्हा परिषदेच्या मैदानावर ऑल इंडिया हॉकी टुर्नामेंटची जय्यत तयारी करण्यात आली असुन या निमंत्रित हॉकी स्पर्धेत चाळीस संघ सहभागी होणार आहेत. मान्यवरांच्या उपस्थितीत उदघाटन सोहळा आयोजित करण्यात आला असुन स्पर्धे करिता संघ हिंगोलीत दाखल होत आहेत. आज हॉकी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी मैदानाची पाहणी केली.

राज्य हॉकी असोसिएशनच्या मान्यतेने जिल्हा हॉकी असोसिएशन हिंगोली यांच्या पुढाकाराने हिंगोली येथील जुन्या जिल्हा परिषदेच्या मैदानावर रविवार दि.८ फेब्रुवारी रोजी सकाळी १२.३० वाजता या स्पर्धेचा उदघाटन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या स्पर्धा स्व.डेप्युटी कमिशनर ऑफ पोलिस महाराष्ट्र दयानंद श्रीलेले स्वर्ण चषक ऑल इंडिया टुर्नामेंट हिंगोली असे नामकन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उदघाटन खा.नागेश पाटील आष्टीकर, मंत्री दर्जा प्राप्त आमदार तथा बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्र वसमत चे अध्यक्ष ना.हेमंत पाटील, आ.तान्हाजी मुटकुळे, आ.संतोष बांगर, आ.राजु भैय्या नवघरे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा पोलिस अधिक्षक डॉ.निलभ रोहन, नगराध्यक्षा रेखाताई बांगर, माजी आ.गजानन घुगे, न.प.गटनेते श्रीराम बांगर, उपनगराध्यक्ष माबुद बागवान, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, मुख्याधिकारी अरविंद मुंढे, आरटीओ राहुल गावंडे, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश मारावार यांच्यासह प्रमुख अतिथी म्हणुन सुनिल देवडा, रामचंद्र कयाल, सुभाषचंद्र तापडिया, कमलकिशोर काबरा, बाबा नाईक, गजेंद्र बियाणी, राजेश जयस्वाल, शरद जयस्वाल, ललितराज खुराणा, प्राचार्य डॉ.विलास आघाव, जगजितराज खुराणा, राजु शिंदे, भाटीयाजी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या हॉकी स्पर्धेमध्ये देशभरातील चाळीस संघ सहभागी होणार असुन मुंबई पोलिस, ब्रम्हपुरी, नागपुर सिटी पोलिस, खालसा नांदेड, परभणी, कोल्हापुर, सांगली, पुणे, अमरावती या हॉकी संघानी नोंदणी केली आहे. ही स्पर्धा दि.८ फेब्रुवारी ते दि.१५ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या स्पर्धा जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने स्पर्धा यशस्वीतेसाठी असोसिएशनचे अध्यक्ष ओमप्रकाश श्रीलेले, सचिव प्रकाश वाघमारे, जितेंद्र भट्ट, आयुब पठाण, केशव दुबे, कल्याण देशमुख, गोविंद निलजेवार, शैलेश मुदीराज, ओम दुबे, अनिल मुदीराज, राजु लोहगावकर, आनंद भट्ट, संदीप मुदीराज, सचिन शर्मा, शेषराव कर्हाळे, ओमप्रकाश (आण्णा)मुदीराज, सुभाष वाघमारे, विशाल मुदीराज, फुलचंद जयस्वाल, श्रीनिवास मंगरुळकर, आशुतोष श्रीलेले, शांताराम मुदीराज यांच्यासह पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दोघांनी केले मरणोत्तर देहदान




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय येथे पहिले देहदान करण्यात आले. जगद्गुरु नरेंद्राचार्य यांच्या प्रेरणेने तसेच मयताच्या कुटुंबातील सदस्यांच्या सहमती वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी तसेच संशोधनासाठी सौ. सुनिता शिवाजी सवलके व कुटुंबांनी कै. किसन बापूराव धनगरे यांचा देह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे मरणोत्तर देहदान करण्यात आले.

याप्रसंगी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हिंगोलीचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर उगराजीराव मुंगल यांनी मैताच्या कुटुंबातील सर्व सदस्यांची जगद्गुरू नरेंद्राचार्य या संस्थेतील सर्व अनुयायी यांचे देहदानाबाबत प्रेरित केल्याबाबत सर्व अनुयायी यांचे आभार व्यक्त केले. तसेच शरीररचनाशास्त्र विभाग प्राध्यापक तथा विभाग प्रमुख डॉ.अनुजा देशमुख यांनी वेळोवेळी देहदानासाठी वेगवेगळे देहदान जनजागृती उपक्रम राबविले तसेच शरीररचनाशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ.विशाल टेकाळे यांनी भविष्यातील डॉक्टर घडविण्याकरिता या देहदानाचा निश्चितच उपयोग होईल याबद्दल मैताच्या सर्व कुटुंबातील सदस्यांचे तसेच जगद्गुरू नरेंद्राचार्य यांच्या सर्व अनुयायी यांचे आभार मानले.

या देहदानाच्या उपक्रमामध्ये शरीररचनाशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ.स्वप्निल ढोणे तसेच प्रयोगशाळा तंत्रज्ञ दिगंबर मुटकुळे व अजय सोनने, विभागातील कार्यरत सर्व वर्ग चार कर्मचारी यांनी मोलाची भूमिका पार पाडली.

# माय भारत क्वेस्ट २०२६ चे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

मेरा युवा भारत, युवा कार्यक्रम विभाग, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, हिंगोली कार्यालयाच्या वतीने युवकांमध्ये केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत जागरूकता व समज विकसित करण्याच्या उद्देशाने 'माय भारत बजेट क्वेस्ट २०२६' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा उपक्रम क्विझ स्पर्धा नोंदणी मोहिमेचा एक भाग असून तो बहुस्तरीय व सहभागी स्वरूपात राबविण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन प्रश्नमंजुषा (क्विझ) आयोजित करण्यात येणार असून ही स्पर्धा दि. ०३ ते १७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत होणार आहे. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या युवकांनी माय भारत पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रश्नमंजुषा टप्प्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सहभागींची राज्य व केंद्रशासित प्रदेश स्तरावर निबंध लेखन टप्प्यासाठी निवड करण्यात येणार असून, या टप्प्यात सहभागी युवकांना केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ च्या प्रमुख विषयांवर आपले विचार मांडण्याची संधी मिळणार आहे. कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यात राज्य व केंद्रशासित प्रदेश स्तरावर निवडलेल्या युवकांना केंद्रीय अर्थसंकल्पावर धोरणकर्ते व मान्यवरांशी आभासी संवाद साधण्याची संधी देण्यात येणार आहे. यामुळे युवकांमध्ये धोरण प्रक्रियेबाबतची समज, जागरूकता व सहभाग अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे. 'माय भारत बजेट क्वेस्ट २०२६' हा युवकांना केंद्रीय अर्थसंकल्पाशी जोडणारा एक अर्थपूर्ण उपक्रम असून, या माध्यमातून युवकांना धोरणनिर्मितीची प्रक्रिया समजून घेण्याची व त्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्याची संधी मिळणार आहे.

जिल्ह्यातील सर्व युवकांनी दि. ०३ ते १७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत माय भारत पोर्टलवर नोंदणी करून मोठ्या संख्येने या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी, मेरा युवा भारत, हिंगोली यांनी केले आहे.




**हिंगोली– येथील जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाच्यावतीने क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कलाकारांनी शेतकरी नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच कलाकार दिसत आहेत. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### कळमनुरीत मटका, जुगार अड्ड्यावर धाड

हिंगोली– शहरातील नवीन बसस्थानक परिसरात एक इसम लोकांकडून पैसे घेवून त्यांना राजेश्री नावाचे मटक्याचे आकड्याच्या चिठ्ठ्या संगणकावर प्रिंट काढून देत असल्याची माहीती अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या पथकाला मिळाली. या माहीतीच्या आधारे हिंगोली पोलिस कार्यालयातील पथकातील पोलिस कर्मचारी पवार, टाले यांनी सदर ठिकाणी छापा मारला. यावेळी पुरूषोत्तम उर्फ विला कऱ्हाळे रा ब्राम्हणगल्ली हा लोकांकडून पैसे घेवून त्यांना राजेश्री नावाचे मटक्याच्या आकड्याचे चिठ्ठ्याचे संगणकाद्वारे प्रिंट देत असतांना आढळून आला. पथकाने कारवाई करीत नगदी ६३०० रूपये व एक संगणक, प्रिंटर असा एकूण २२ हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास जमादार इंगोले हे करीत आहेत.

### जिजाऊ ब्रिगेडची हिंगोलीत बैठक



हिंगोली– येथील शासकीय विश्रामगृहात जिजाऊ ब्रिगेडची आढावा बैठक संपन्न झाली. प्रदेश अध्यक्ष सीमाताई बोके यांनी सदर बैठकीमध्ये हिंगोली जिजाऊ ब्रिगेड च्या कार्याचा आढावा घेतला व हिंगोली जिल्हा कार्यकारिणी करत असलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच संघटन अजून वाढण्यासाठी मार्गदर्शन केले. ०३ एप्रिल २०२६ ला जिजाऊ ब्रिगेड चे ९ वे अधिवेशन मुंबई दादर येथे होणार आहे. त्या अधिवेशनाला मोठ्या संख्येने महिलांनी उपस्थिती लावावी म्हणून प्रदेशाध्यक्ष नी आवाहन केले. या बैठकीला प्रदेश उपाध्यक्ष ज्योतीताई कोथळकर, जिल्हाध्यक्ष प्रियंका भोयर, उपाध्यक्ष स्मिताताई दळवी, उपाध्यक्ष सुनिताताई भालेराव, सचिव संजीवनी पडोळे, कार्याध्यक्ष सुरेखा जगताप, संघटक अर्चना वाघ, सहसंघटक स्वाती कऱ्हाळे, प्रचार प्रसिद्धी प्रमुख योगिता देशमुख व कल्पना सोळंके, सदस्य कल्पना निळकंठे, सोनिया इंगोले, ज्योतीताई चौतमाल यांच्या सह अनेक महिला उपस्थित होत्या.

### ३८ वाहन चालकांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३८ वाहन चालकांविरूध्द विविध ठिकाणी पोलिसांनी कारवाई करीत वाहन चालकांकडून ३९ हजार ५०० रूपयांचा दंड वसूल केला आहे. तसेच अवैध दारू विक्री अंतर्गत पोलिसांनी एका ठिकाणी छापा मारला असून आरोपीकडून मुद्देमाल जप्त करीत संबंधिताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुगार बंदी कायद्यांतर्गत पोलिसांनी जिल्ह्यात एका ठिकाणी जुगार अडड्यावर छापा मारला असून घटनास्थळाहून जुगाराचे साहित्य व मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दलालांच्या आमिषाला बळी पडू नये पोलिस अधीक्षकांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

हिंगोली जिल्हा पोलिस दलातील ६४ पदांसाठी दि ११ फेब्रुवारीपासून प्रत्यक्ष भरती प्रक्रियेला सुरूवात होणार असून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडली जाणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी दलालांच्या आमिषाला बळी पडू नये असे आवाहन पोलिस अधीक्षक निलाभ रोहन यांनी केले आहे.

यासंदर्भात पोलिस अधीक्षक निलाभ रोहन यांनी सांगितले की, जिल्हा पोलिस दलातील शिपाई पदाच्या ३७ तर चालक पदाच्या २७ जागांसाठी भरती प्रक्रिया राबविली जाणार आहे. या भरतीसाठी सुमारे १३ हजार उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यानुंसार दि ११ फेब्रुवारीपासून संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर भरती प्रक्रियेला सुरूवात होणार आहे. त्यासाठी सुमारे २०० पेक्षा अधिक पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या भरती प्रक्रियेच्या सुरूवातीच्या टप्प्यात उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. दररोज ९०० ते १००० उमेदवार कागदपत्र तपासणीसाठी बोलावले जाणार आहेत. उमेदवारांनी येताना सहा पासपोर्ट फोटो व ऑनलाईन अर्ज दाखल करतांना सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या प्रती आणणे आवश्यक आहे. कागदपत्राशिवाय उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचे साहित्य आणू नये. त्यानंतर पुढील प्रक्रिया राबविली जाणार आहे.

सदर भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असणार आहे. भरती प्रक्रियेच्या वेळी परिसरात विनाकारण फिरणाऱ्यांवर कायदेशीर कार्यवाही केली जाणार आहे. तर उमेदवारांनीही मैदानी चाचणीच्या वेळी उत्तेजक द्रव्य घेवून येऊ नये. यावेळी संशयित उमेदवारांची तपासणी केली जाणार असून उत्तेजक द्रव्याचे सेवन केल्याचे आढळून आल्यास उमेदवारावर कारवाई केली जाणार आहे. भरती प्रक्रियेच्यावेळी छायाचित्रीकरण केले जाणार असून सीसीटीव्ही कॅमेरे देखील बसविले जाणार असल्याची माहीती निलाभ रोहन यांनी दिली आहे.

# श्री हनुमान मंदिर केंद्रा येथे ज्ञानेश्वरी पारायणाचा सुवर्णमहोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

केंद्रा खुर्द ता. सेनगाव येथे सन १९७७ पासून अखंड सुरु असलेल्या ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाचे हे ५० वे वर्ष त्या निमित्त केंद्रा खुर्द येथे जय्यत तयारी सुरु आहे. दि. ९ फेब्रुवारीपासून हा सुवर्ण महोत्सवी ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथा श्रवण सप्ताह मोठ्या ऊत्साहाने सुरु होत आहे.

या सप्ताहामधे वारकरी संप्रदायातील दिग्गज महाराजांची सुश्राव्य किर्तनं होणार आहेत. त्यामधे श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते ह.भ.प. ऊमेश महाराज दशरथे असणार आहेत. ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ चालक ह.भ.प. गणेश महाराज हुंबाड असणार आहेत.

दैनंदिन नित्य नेम काकडा भजन,भागवत कथा,ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन,हरिपाठ रात्री किर्तन असा राहणार आहे. या सप्ताहात दि. ९ फेब्रूवारी ला ह.भ.प.महादेव महाराज राऊत बीड.दि.१० फेब्रूवारी ला ह.भ.प. विशाल महाराज खोले मुक्ताई नगर, दि.१० फेब्रूवारी ह.भ.प.ऊमेश महाराज दशरथे परभणी, दि.१२ फेब्रुवारीला ह.भ.प.बाळू महाराज गिरगावकर, दि.१३ फेब्रुवारीला ह.भ.प.संजय महाराज पाचपोर, दि.१४ फेब्रुवारीला ह.भ.प.पांडुरंग महाराज घुले आळंदी, दि.१५ फेब्रुवारीला ह.भ.प.चैतन्य महाराज देगलूरकर, दि.१६ फेब्रुवारीला सकाळी १० ते १२ या वेळात ह.भ.प.अच्यूत महाराज दस्तापूरकर यांचे काल्याचे किर्तन होणार असून नंतर महाप्रसाद वाटप होणार आहे.

सप्ताहा दरम्यान गुणीजनांची विशेष ऊपस्थिती राहणार आहे. ज्यात संजय महाराज देवसरकर, पंढरीनाथ महाराज कदम,कैलास महाराज पोळ, डिगांबर महाराज कुटे, दामोदरबुवा इंगोले, गजानन महाराज मुळे, मृदंगमणी मंगेश महाराज गोरेगावकर व अमोल महाराज केंद्रेकर हे ऊपस्थित राहणार आहैत. या सुवर्ण महोत्सवी सप्ताहासाठी गावकरी मंडळी परिश्रम घेत आहेत. तरी पंक्रोशीतील भावीकांनी श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन केंद्रा खुर्द गावकरी आणि पारायण समिती यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# रामलीला मैदानाची सफाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

येथील रामलीला मैदानावर कचऱ्याचे ढीग व अस्वच्छता झाल्यामुळे खेळाडूंना खेळण्यासाठी जागा नव्हती. या संदर्भात वर्तमानपत्रातून बातम्या प्रसिध्द होताच याठिकाणी नगर पालिकेने जेसीबीच्या सहाय्याने कचऱ्याचे ढीग उचलून मैदानाची सफाई करण्यास सुरूवात केली आहे. शिवजयंती निमित्त याठिकाणी पत्रकारसंघांच्यावतीने क्रिकेट सामान्यांचे आयोजन करण्यात आले असून युवासेनेचे जिल्हा प्रमुख राम कदम मित्रमंडळाच्यावतीने दोन दिवसांपासून मैदानाचे सपाटीकरण तसेच स्वच्छता करण्याचे काम युध्दपातळीवर हाती घेण्यात आले आहे. मैदानाच्या सफाईमुळे खेळाडूंमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# सोशल मिडीयावरील अश्लीलतेविरोधात पंतप्रधानांना पत्र

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ फेब्रुवारी**

संस्कृती रक्षक दल भारत, शाखा हिंगोली यांच्या वतीने श्री शांतिनाथ श्वेतांबर जैन मंदिर उपाश्रय येथे सर्वधर्मीय समाजबांधवांची एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीचे अध्यक्षस्थानी विहिंपचे जिल्हाध्यक्ष डॉ. मुरलीधर तोष्णीवाल यांची उपस्थिती होती. सोशल मिडीयावरील अश्लीलतेविरोधात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मेल करून यावर बंदी आणण्याबाबत या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

सध्या दूरदर्शन, मोबाईल, व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुक, इन्स्टाग्राम यांसारख्या माध्यमांमधून मोठ्या प्रमाणात अश्लीलता प्रसारित होत असून त्यामुळे भारतीय संस्कृती, समाजजीवन आणि कुटुंबव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघ व जागतिक आरोग्य संघटनेने संपूर्ण जगाला लैंगिक शिक्षणाबाबत दिलेले आवाहन हे मानवजातीस व मानवी संस्कृतीस पूरक नाही, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या धोरणांवर पुनर्विचार होणे आवश्यक आहे. अन्यथा येणाऱ्या पिढीवर त्याचे गंभीर दुष्परिणाम होतील, असे लक्षात आले. आज संपूर्ण देशावर, सर्व समाजावर अश्लील दृश्यांचा मारा होत असून त्यामुळे मानसिक, शारीरिक व सामाजिक स्तरावर मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या बाबींविरोधात सर्वधर्मीय समाजबांधवांनी एकत्र येऊन निषेध नोंदवणे आवश्यक असल्याचे मत सर्वानुमते मांडण्यात आले.

अश्लीलतेच्या व्यसनामुळे नैराश्य, चिंता, चिडचिड, एकाग्रतेचा अभाव तसेच इतर मानसिक विकार वाढत आहेत. अश्लीलतेच्या व्यसनामुळे शारीरिक दुर्बलता, आत्मविश्वासाचा अभाव तसेच आरोग्यविषयक समस्या निर्माण होत आहेत. कौटुंबिक नात्यांमध्ये तणाव, अविश्वास, घटस्फोट, गुन्हेगारी प्रवृत्ती, सायबर गुन्हे व सामाजिक अस्थिरता वाढत आहे.

पूर्वीच्या काळात लहान मुलांना लैंगिक शिक्षण दिले जात नव्हते. आज लहान वयातच विषयवासनांचे शिक्षण देणे म्हणजे भारतीय संस्कृतीच्या मुळावर घाव घालणे होय. यामुळे पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव वाढत असून व्यभिचार, नैराश्य, क्रूरता, एचआयव्ही सारख्या गंभीर आजारांचा धोका निर्माण होत आहे. पारंपरिक कुटुंबव्यवस्था कोलमडत असून मानवतेवर कलंक बसत आहे.

अश्लीलता व चुकीच्या पद्धतीने दिल्या जाणाऱ्या लैंगिक शिक्षणामुळे मुलांचे व युवकांचे आयुष्य उध्वस्त होत आहे. याबाबत शासनाने तातडीने कठोर पावले उचलावीत व भारतीय संस्कृतीचे संरक्षण करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांना विविध माध्यमाद्वारे प्रसारित होत असलेले अश्लीलते विरोधात ई-मेलद्वारे निवेदन पाठविण्यात येईल. देशातील नागरिकांनी मोठ्या संख्येने अश्लीलतेविरोधात ई-मेल पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले. यावेळी प्रकाशचंद सोनी, डॉ. मुरलीधर तोष्णीवाल, परसराम हेंबाडे, अ‍ॅड. राजेंद्र अग्रवाल, लक्ष्मीकांत शिराडकर, अ‍ॅड. मनीष साकळे, प्रवीण सोनी,नरेंद्र सोनी, सुनील जगताप, सचिन सोळंके, प्रा. डी. एम. कुलकर्णी, डॉ. महाले, हर्षवर्धन परसवाळे, सावरमल अग्रवाल,हिताक्ष शाह आदी सदस्यांची एक समिती स्थापन करण्यात आली. शाळांमधून दिले जाणारे लैंगिक शिक्षण तात्काळ बंद करण्यात यावे. यासाठी डॉक्टर व समुपदेशकांमार्फत मार्गदर्शनाचा पर्याय वापरावा. कुटुंबीयांना अश्लील व्हिडिओंपासून वाचवण्यासाठी उपलब्ध असलेल्या गुगल अ‍ॅप्सबाबत माहिती देण्यात आली. मुलांच्या अभ्यासासाठी सायंकाळी सहानंतर मोबाईल पालकांनी स्वतःकडे ठेवावेत, असे आवाहन करण्यात आले. या बैठकीस वीरोन पतंगे, अरविंद सावळे, चेतन अग्रवाल, सुरेशचंद सोनी, सचिन ओस्तवाल, राजेंद्र हलवाई, सुरेशचंद संचेती, राजकुमार बडजाते, शैलेश कानेड, गिरीश लोढाया,आदींसह अनेक नागरिक उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रकाशचंद सोनी यांनी केले.

# रस्ता उंचीकरणामुळे विद्युत तारा तुटण्याचे सत्र सुरू; कायमस्वरुपी उपाय करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ७ फेब्रूवारी-**

देगलूर तालुक्यातील कुशावाडी येथे रस्त्याच्या उंचीकरणाने नागरिकांच्या सुरक्षिततेवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले असून मागील काही महिन्यांपासून विद्युत तारा वारंवार तुटण्याचे सत्र सुरू आहे. होट्टल फाटा ते होट्टल पुढे करडखेडकडे जाणारा रस्ता नव्याने बांधण्यात आल्याने रस्त्याची उंची वाढली; मात्र या रस्त्यावरून जाणाऱ्या महावितरणच्या विद्युत ताऱ्यांची उंची मात्र कमी झाली आहे. परिणामी उंच वाहनांचा स्पर्श होऊन या तारा वारंवार तुटत असल्याने मोठ्या अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या घटनेची माहिती मिळताच महावितरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्पुरत्या स्वरूपात मलमपट्टी केली असली तरी कायमस्वरूपी उपाययोजना आवश्यक आहे.

कुशावाडी गावात रस्त्याच्या एका बाजूस असलेल्या डीपीपासून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूस गावाकडे जाणाऱ्या विद्युत तारा थेट रस्त्यावरून जात आहेत. यामुळे उंची असलेली वाहने या तारांना स्पर्श करून त्या तुटून थेट रस्त्यावर कोसळण्याचे प्रकार घडत आहेत. ही परिस्थिती अत्यंत धोकादायक असून एखाद्या क्षणी मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेष म्हणजे याच परिसरात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्मारके आहेत. तुटलेल्या विद्युत तारांमुळे या स्मारकांना नुकसान पोहोचण्यासह नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

**बातमीपुरते नव्हे, सामाजिक कर्तव्यही निभावले**



दि. ७ फेब्रुवारी रोजी दुपारी तीनच्या सुमारास या मार्गाने जाणाऱ्या एका वाहनामुळे विद्युत तार तुटून ती थेट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाभोवती गुंडाळली गेली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, धोका किती गंभीर आहे हे या घटनेने अधोरेखित केले. या घटनेची माहिती मिळताच प्रस्तुत प्रतिनिधी मिलिंद वाघमारे यांनी सामाजिक बांधिलकी जपत महावितरण देगलूर विभागाचे उपकार्यकारी अभियंता चाटे यांना प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती दिली. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी उंचीचे खांब उभारणे अत्यावश्यक असून विद्युत तारांच्या स्पार्कमुळे स्मारकांसह नागरिकांना धोका होऊ शकतो, हा परिसर वर्दळीचा व बसस्थानकाचा असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. यामुळे तरुण भारत केवळ बातमीपुरते न थांबता सामाजिक जबाबदारीही पार पाडते, अशी भावना नागरिकांसह महावितरण कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. यावेळी उपकार्यकारी अभियंता चाटे यांनी तात्काळ कारवाईचे आश्वासन दिले.

**बसस्थानक, हॉटेल्स, दुकानांना धोका अधिक तीव्र**

हा परिसर अत्यंत वर्दळीचा असून येथे कुशावाडी गावाचे बसस्थानक आहे. शिवाय दोन हॉटेल्स, कृषी सेवा केंद्र, इलेक्ट्रिक साहित्याचे दुकान असल्याने दिवसभर नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनी, ज्येष्ठ नागरिक व प्रवासी नेहमीच येथे थांबलेले असतात. अशा ठिकाणी वारंवार विद्युत तारा तुटणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी थेट खेळ करण्यासारखे आहे.

**उंच खांबाशिवाय दुसरा पर्याय नाही !**

नव्याने झालेल्या रस्त्यामुळे विद्युत तारांची उंची कमी झाली असून त्यामुळेच हे प्रकार वारंवार घडत आहेत. या पार्श्वभूमीवर महावितरण विभागाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी योग्य उंचीचे नवीन विद्युत खांब उभारावेत किंवा तात्पुरता उपाय म्हणून सध्याच्या खांबांची उंची वाढवावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांतून होत आहे.

**याआधीही अनेकदा तार तुटल्या**

ही पहिलीच घटना नसून यापूर्वीही अनेक वेळा या मार्गावर विद्युत तारा तुटल्या आहेत. विशेषतः रात्री-बेरात्री एखाद्या वाहनामुळे तार तुटल्यास प्रवाशांच्या जीवाला मोठा धोका निर्माण होत आहे.

**तात्पुरती मलमपट्टी नको, कायमस्वरूपी उपाय हवा**

घटना घडताच सुजाण नागरिकांनी महावितरण विभागाला माहिती दिली. त्यानंतर विभागाचे कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल होऊन तुटलेल्या तारांची दुरुस्ती केली. मात्र ही कारवाई केवळ तात्पुरती मलमपट्टी ठरत असून कायमस्वरूपी उपाययोजना केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नसल्याचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## इच्छापूर्ती वरद विनायक मंदिरात मध्यरात्री चोरट्यांचा धुमाकूळ

**हिमायतनगर** - हिमायतनगर येथील इच्छापूर्ती वरद विनायक मंदिरात चतुर्थीच्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांच्या टोळीने धुमाकूळ घातला. चोरट्यांनी मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेरे फोडून, दोन ते तीन कुलूप



असलेला लोखंडी गल्ला तोडून त्यातील रोख रक्कम व इतर साहित्य लंपास केले आहे. एवढेच नव्हे तर, पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने सीसीटीव्हीचा डीव्हीआरही चोरून नेला. ही घटना शुक्रवार, दि. ६ रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या निदर्शनास आली. मंदिरात झालेली तोडफोड व चोरी पाहून भाविकांनी तत्काळ मंदिर समितीला ही माहिती दिली. त्यानंतर हिमायतनगर पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि पंचनामा करत प्राथमिक पाहणी केली. पोलिसांनी या घटनेचा तपास श्वान पथकाच्या मदतीने करण्यात येईल, असे सांगितले आहे. मात्र, विशेष बाब म्हणजे हे मंदिर पूर्वीही चोरट्यांच्या निशाण्यावर राहिले आहे. मागील काही वर्षांत ७ते ८ वेळा या ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या आहेत. त्या घटनांचा तपास अद्याप पूर्णपणे लागलेला नाही. असे असतानाच, आता ऐन संकष्टी चतुर्थीसारख्या पवित्र दिवशीच पुन्हा चोरी झाल्याने भाविकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे. हिमायतनगर येथील वरद विनायक मंदिर देवस्थानात वारंवार होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे सुरक्षेचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा बनला आहे. पोलिसांनी या घटनेचा तातडीने तपास लावून दोषींना अटक करावी, तसेच मंदिराच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी भाविक व नागरीकाकडून होत आहे.

## सिडको येथे माता रमाई आंबेडकर जयंती महोत्सव उत्साहात साजरा

**नवीन नांदेड-** रमाई आंबेडकर चॅरिटेबल ट्रस्ट भीमवाडी यांच्यावतीने रमाई आंबेडकर जयंती महोत्सव दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी रमाई आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात रमाई स्मारकाच्या भव्य



मैदानात पार पडला. या ठिकाणी सकाळी १०:३० वाजता पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. सिडको परिसरातील रमाई आंबेडकर स्मारक येथे रमाई चॅरिटेबल ट्रस्ट भिमवाडी यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे गेली १३ वर्षापासून रमाई जयंती महोत्सव साजरा करण्यात येतो. त्याचप्रमाणे दिनांक ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ठीक १०:३० वाजता ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत कांबळे यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ट्रस्टचे उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, सचिव राजू वाघमारे, सहसचिव राजू तायडे, कोषाध्यक्ष भंते राजरत्न सेनापती, सदस्य उत्तम डाकोरे, पंढरीनाथ सावळे, गोविंद सरोदे, सिद्धार्थ भालेराव, विलास वाघमारे, गयाबाई पवार यांचसह समाज बांधवांची मोठी संख्येने उपस्थिती होती. दरम्यान दुसऱ्या सत्रात दुपारी ४ वाजता भीमवाडी ते माता रमाई चौक स्मारक दरम्यान माता रमाई यांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक काढण्यात आली.यावेळी माता रमाई चौक येथील रमाई पुतळ्यास पुष्पहार व पुष्प अर्पण करून हजारो समाज बांधवांनी अभिवादन केले. त्यानंतर या ठिकाणी सायंकाळी ५ ते ९:३० दरम्यान बुद्ध भीम गीतांचा कार्यक्रम महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक रविराज भद्रे व सुप्रसिद्ध गायिका अंकिताताई नांदेडकर यांच्या मधुर गायनाच्या आनंद हजारो समाज बांधवांनी आनंद घेतला. हा जयंती सोहळा पार पाडण्यासाठी ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत कांबळे सचिव राजू वाघमारे व त्यांची पूर्ण कार्यकारिणी व तसेच गणपत भुरे, काशिनाथ कांबळे, उत्तम वाघमारे व भीमवाडी येथील श्रद्धावान बौद्ध उपासक उपासिका यांनी परिश्रम घेतले. तसेच सिडको हडको परिसरात तील ठिकठिकाणीच्या बुद्ध विहारात माता रमाई आंबेडकर जयंती निमित्त माता रमाई आंबेडकर यांना पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. काही ठिकाणी अन्नदान व खेळ दान ठेवण्यात आले होते.

## मरवाळीतांडा आश्रम शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांचा भावनिक निरोप समारंभ

**नायगाव-** नायगांव तालुक्यातील मरवाळी तांडा येथील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक आश्रम शाळेमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात व अत्यंत भावनिक वातावरणात पार पडला. वाडीतांडा परिसरातील विमुक्त जाती व भटक्या जमातीतील मुले शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात यावीत, या उद्देशाने कै. वसंतराव नाईक यांनी शैक्षणिक संकुलाची संकल्पना राबवली. या संकल्पनेतून या समाजातील विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती करत आहेत.प्राचार्य विजयकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शना खाली आयोजित या कार्यक्रमास सेवानिवृत्त प्राचार्य किशन राठोड, धोंडीबा तेलंग, नागनाथ पा. येल्लूरे, सूर्यकांत जाधव, आनंदराव सूर्यवंशी,गुणवंत कुंदूर्के, शेख मुजमिल आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सहशिक्षक आनंदराव सूर्यवंशी, प्राचार्य विजयकुमार देशमुख तसेच माजी प्राचार्य किशन राठोड यांनी दहावीतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. निरोप समारंभाचे औचित्य साधून विद्यार्थिनी रुपाली नावंदे, दूर्गेश्वरी वजीरगावे, अश्विनी जाकोरे व समिक्षा बालाजी भेंडे कर यांनी शिक्षकाप्रती कृतज्ञता व्यक्त करत आपले भावपूर्ण मनोगत सादर केले. त्यांच्या भाषणामुळे उपस्थितांचे मन हेलावून गेले. यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांनी सामूहिकपणे शाळेला सरस्वती देवीची मूर्ती भेट दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी रुपाली नावंदे हिने केले, तर आभार प्रदर्शन शिक्षिका अश्विनी जाकोरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# चुडावा येथे निराधार पतीच्या निधनानंतर पत्नीकडून अंतिम विधी

**तभा वृतसेवा**
**चुडावा, दि. ७ फेब्रूवारी-**

संततीचा आधार नसलेल्या निराधार दाम्पत्यातील श्यामलिंगय्या यांचे अचानक निधन झाल्यानंतर चुडावा येथे माणुसकीचे हृदयस्पर्शी दर्शन घडले. परंपरेनुसार पतीच्या निधनानंतर कराव्या लागणाऱ्या विधींसाठी मुलगा नसल्याने त्यांची पत्नी नागाबाई श्यामलिंगय्या यांनीच पतीचा अंतिम विधी पार पाडला. यात सामाजिक कार्यकर्ते विनायक देसाई व त्यांच्या कुटुंबीयांनी पुढाकार घेत जबाबदारी निभावली.

तेलंगणा राज्यातून सुमारे ५० वर्षांपूर्वी उदरनिर्वाहासाठी श्यामलिंगय्या व नागाबाई हे दाम्पत्य चुडावा येथे आले होते. सुरुवातीला शेतीमजुरी करून त्यांनी आपला संसार चालवला. संतती नसल्याने आयुष्यभर त्यांनी कष्टालाच आधार मानला. वय वाढल्यानंतर शारीरिक अशक्तपणाने मजुरी करणे अशक्य झाल्यावर त्यांनी शेळीपालनाचा व्यवसाय सुरू केला. त्यातून मिळणाऱ्या तुटपुंज्या उत्पन्नावर त्यांची गुजराण सुरू होती. मात्र गरिबी, आजारपण आणि दुर्दैव यांचा पाठलाग काही केल्या सुटला



नाही. एकदा त्यांच्या आयुष्यभराच्या बचतीतील दागिन्यांची चोरी झाली. त्यानंतर श्यामलिंगय्या यांची प्रकृती गंभीर झाली. नागाबाई यांनी आपल्याकडील सर्व भांडवल खर्च करून पतीवर उपचार केले व त्यांना सुखरूप घरी आणले. मात्र काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीने ते एका पडक्या इरिगेशन कॅनॉलजवळील गळक्या छपराच्या ठिकाणी शेळ्यांसह वास्तव्यास होते. ५ ते ७दिवस त्यांना अशा परिस्थितीत रात्रंदिवस काढावे लागले. या दरम्यान सामाजिक कार्यकर्ते विनायक देसाई यांनी या दाम्पत्याची दखल घेत भेट घेतली. आम्हाला कोणी वाली नाही, सरकार नाही, मुलगा नाही, असे सांगत दाम्पत्याने हंबरडा फोडला. नंतर विनायक देसाई यांनी त्यांची जबाबदारी स्वीकारून दैनंदिन मदत सुरू केली. दि.४ फेब्रुवारीला रात्री ९ ते १० वाजेच्या सुमारास श्यामलिंगय्या यांना अचानक पोटदुखी, उलट्या व हृदयविकाराच्या लक्षणांमुळे त्रास झाला. त्यातच त्यांचे निधन झाले. ही माहिती त्यांचे पुतणे सुरेश देसाई यांनी विनायक देसाई यांना दिली. मुलगा नसल्याने रात्री ११ ते १२ दरम्यान चुडावा येथे विनायक देसाई, सुरेश देसाई व त्यांच्या मित्रपरिवाराने पुढाकार घेत श्यामलिंगय्या यांचा अंत्यविधी परंपरेनुसार पार पाडला.

पतीच्या निधनानंतर पाणी पाजण्यासह इतर विधी पत्नी नागाबाई यांनीच केले. दुसऱ्या दिवशी सकाळी उर्वरित धार्मिक विधी पार पाडले. यावेळी विनायक देसाई यांनी नागाबाई यांना मानसिक आधार देत, आम्ही कुटुंबासारखे तुमची अखेरपर्यंत जबाबदारी घेऊ, अशी ग्वाही दिली. अंत्यविधी व विधींसाठी सुनील देसाई, मारुती पांचाळ, चंद्रकांत कुट्टे, चांडोजी मुकदम, हनुमंत वाघमारे आदींनी नागाबाई यांना धीर दिला.

# तहसील कार्यालय व परिसरात खासगी दलाल-एजंट यांना सक्त मनाई

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ७ फेब्रूवारी-**

तहसीलदार हा तालुका स्तरावरील प्रशासनाचा कणा मानला जातो, ज्यावर कायदे आणि सुव्यवस्था राखण्याची मोठी जबाबदारी असते. आणि ही जबाबदारी माहूरचे तहसीलदार अभिजित जगताप हे चोखपणे पार पाडत असल्याचे नुकताच त्यांनी घेतलेल्या एका लोकहितवादी निर्णयावरुन स्पष्टपणे दिसून येते. आणि ते म्हणजे,तहसील कार्यालय व परिसरात कोणत्याही प्रकारचे अनाधिकृत दलाल/एजंट यांना प्रवेश व काम करण्यास सक्त मनाई असल्याचा सूचना फलक लावून प्रतिबंध केला आहे. तसेच दलाली करताना कोणी आढळून आल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असा सूचनावजा कडक इशाराही सूचना फलकावर लिहिला आहे.

तहसीलदार कार्यालयात किंवा प्रशासकीय इमारतीत अनधिकृत मध्यस्थ (दलाल) पैसे घेऊन सामान्य नागरिकांची कामे करून घेतात, त्यांना रोखणे म्हणजे पारदर्शक कारभार करणे होय. यामुळे लाचखोरीला आळा बसतो, कामात गतिमानता येते, थेट नागरिकांचा अधिकाऱ्यांशी




संवाद वाढतो आणि शासकीय कामांत पारदर्शकता व विश्वासार्हता निर्माण होते. याच जाणिवेतून आणि जबाबदारीतून माहूरचे तहसीलदार अभिजित जगताप यांनी तहसील कार्यालय व परिसरात नागरिकांची फसवणूक होऊ नये तसेच शासकीय कामकाजात पारदर्शकता राखण्यासाठी खासगी दलाल व एजंट यांना प्रतिबंध करण्याचा निर्णय घेतला आहे.तहसील कार्यालयातील सर्व शासकीय कामकाज हे संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत थेट केले जाते. कोणत्याही प्रकारचे काम करून देण्याचे आमिष दाखवणारे दलाल, एजंट किंवा मध्यस्थ यांना कार्यालयीन परिसरात फिरण्यास मज्जाव करण्यात आला आहे. अशा व्यक्ती आढळून आल्यास त्यांच्यावर नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.महत्वाचे म्हणजे सदरील सूचना फलकावर तहसील कार्यालय स्तरावर मदत केंद्राची स्थापना केली असल्याचेही ठळकपणे अधोरेखित केले आहे. ज्याचा अधिकृत क्रमांक ०२४६०-२६८५२१ असा आहे.

तालुक्याचा प्रमुख महसूल अधिकारी म्हणून एक आदर्श तहसीलदार कसा असावा तर प्रशासकीय बाबींमध्ये निपुण, कर्तव्यदक्ष, कायद्याचे ज्ञान असलेला, आणि जनतेच्या तक्रारी तत्परतेने सोडवणारा असावा लागतो. याचे ज्वलंत उदाहरण म्हणून माहूरचे तरुण आणि तडफदार तहसीलदार अभिजित जगताप यांचे नाव त्यांच्या विशिष्ट कार्यशैलीवरुन तालुका प्रशासनातच नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांमधूनही मोठ्या आदराने घेतले जाते. त्याचाच एक भाग म्हणून तहसीलदार जगताप यांनी प्रशासकीय इमारतीच्या बाहेरील मुख्य गेटवर सूचना फलक लावून तहसील कार्यालय व परिसरात कोणत्याही प्रकारचे अनाधिकृत दलाल/एजंट यांना प्रवेश व काम करण्यास सक्त मनाई केली आहे. या लोकहितवादी निर्णयाचे सर्वसामान्य नागरिकांमधून स्वागत करण्यात येत आहे.

# सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याला गुन्हेगारांकडून जीवे मारण्याची धमकी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ फेब्रूवारी-**

कर्तव्यावर असताना भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहुलनगर तरोडा बु. येथे किरकोळ कारणावरून पोलिसावर व त्याच्या कुटुंबीयांवर सन २००८ मध्ये प्राणघातक हल्ला करणाऱ्या गुन्हेगारांनी जिल्हा न्यायालयात गुरुवार दिनांक ५ फेब्रुवारी रोजी साक्षसाठी आलेल्या सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्यास केस मागे घे, अन्यथा परिणाम वाईट होतील असे म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात पीडित पोलीस अधिकाऱ्यांच्या फिर्यादीवरून अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा पोलीस दलात कार्यरत असलेले तत्कालीन पोलीस हवालदार रमेश कांबळे यांच्या घराशेजारी असलेल्या रामजी भीमराव नारळे, जयराम भीमराव नारळे, संभाजी भीमराव नारळे आणि सुमनबाई भीमराव नारळे सर्व राहणार ह. मु. वैशालीनगर, तरोडा बु. या चौघांनी संगणमत करून किरकोळ कारणावरून खंजरने पोलीस अंमलदार रमेश सोनबा कांबळे, पुतण्या यशपाल कांबळे, अमोल कांबळे यांच्यावर चाकूने भोसकून प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. हा प्रकार ३ जून २००८ रोजी घडला होता. त्यानंतर या प्रकरणात भाग्यनगर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास करून भाग्यनगर पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. त्यानंतर या प्रकरणाची अतिरिक्त सत्र न्यायालयासमोर सुनावणी सुरू करण्यात आली. दिनांक पाच फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक रमेश कांबळे व त्यांचे भाऊ हे साक्षसाठी जिल्हा न्यायालयात आले असता उपस्थित वरील आरोपीतांनी पुन्हा धमकी दिली. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

# बाऱ्हाळी येथे जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या पादुका दर्शन सोहळा तयारीस वेग

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. ७ फेब्रूवारी-**

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी संस्थान नानिजच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमा अंतर्गत अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या दि.२४ फेब्रुवारी रोजी बा-हाळी येथील पादुका दर्शन सोहळ्याच्या तयारी वेग आलेला असून मैदानाची पाहणी करण्यासाठी संस्थानच्या अधिकारी पदाधिकारी यांनी बा-हाळीस भेट दिली .

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी संस्थान नानिज च्या वतीने देशासह राज्यात विविध सामाजिक, आरोग्य विषयक ,पर्यावरण ,धार्मिक, अंधश्रद्धा निर्मूलन यासारखे विविध उपक्रम राबविण्यात येत असतात अंधश्रद्धा निर्मूलन या उपक्रमा अंतर्गत नांदेड द. बा-हाळी ता. मुखेड येथे दि २४ फेब्रुवारी रोजी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या सिद्धपादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले असून त्या अनुषंगाने भवानी पेट्रोल पंप ,उदगीर हाळणी रोड शेजारी उमाटे पाटील यांच्या शेतात सदर कार्यक्रम होणार आहे यास नांदेड जिल्ह्यसह लातूर जिल्ह्यातील उदगीर ,जळकोट तालुक्यातून २५ ते ३० हजार भाविक भक्त उपस्थित राहणार असल्याची माहिती मिळत आहे. कार्यक्रमाच्या संदर्भात तयारीस वेग आलेला असून मैदान स्वच्छ करण्यास बा-हाळी, सकनूर ,वडगाव येथील महिला व तरुण वर्ग पुढाकार घेत आहेत .मैदानाची तयारी व पुढील नियोजनासाठी प्रोटोकॉल अधिकारी राघव चव्हाण तेलंगणा उपपीठ प्रमुख तथा नांदेड द. जिल्हा निरीक्षक काकासाहेब वनारसे,ग़गाराम मारेपल्ली, जिल्हा अध्यक्ष श्याम नागलगावे,अशोक चरकूलवार ,राम माचीनवार तालुका अध्यक्ष मारुती इबितवार, शंकर नकाते,बालाजी सोमावार,व्यंकट पा.उमाटे,हनमंत मामा वाडीकर,साईनाथ दाचावार, दिलीप महाजन,साईनाथ कोटगीरे, प्रा.डॉ. निखिल चव्हाण, उत्तम वाडीकर,बालाजी जाधव,शिवाजी गवते,राम,चव्हाण अम्रत पाटील यांच्यासह जिल्हा व तालुका पदाधिकारी उपस्थित होते.

## किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत हमीभावाने तूर खरेदी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ फेब्रूवारी-**

हंगाम २०२५२६ मध्ये तूर पिकाची हमीभावाने खरेदी प्रक्रिया राबविण्यासाठी कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांनी महाराष्ट्र राज्यासाठी एकूण ३ लाख ३७ हजार मेट्रिक टन तूर खरेदीस मंजुरी दिली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दि. १ फेब्रुवारी २०२६ पासून पुढील ९० दिवसांसाठी, म्हणजेच १ मे २०२६ पर्यंत हमीभावाने तूर खरेदी सुरू ठेवण्याबाबत शासनाने कळविले आहे.

# नांदेड जिल्हा निर्यातीसाठी अग्रस्थानी नेणार : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ फेब्रूवारी-**

नांदेड जिल्ह्यात उपलब्ध दळणवळणाच्या भक्कम पायाभूत सुविधा तसेच कृषीवर आधारित उत्पादन क्षमता पाहता निर्यातीसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत. उद्योजकांनी बाजारपेठेचे भान ठेवून भविष्यातील धोके ओळखावेत व केंद्र तसेच राज्य शासनाच्या विविध विभागांशी समन्वय साधून जिल्ह्यात निर्यातीस पोषक वातावरण निर्माण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

निर्यात हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून शासनाच्या विविध सुविधा व योजनांचा लाभ घेऊन नांदेड जिल्ह्याला 'लोकल टू ग्लोबल' करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन




भवन येथे आज महानिर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६ अंतर्गत आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते झाले. या कार्यशाळेस जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे, डाक विभागाचे अधिकारी अक्षय कुलकर्णी, न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीचे चांगदेव शेळके, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अधिकारी पी. डी. मुळे, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी श्री. सोनकांबळे, ए.यू. स्मॉल फायनान्स बँकेचे व्यवस्थापक अमरजितसिंघ, भारतीय स्टेट बँकेचे अधिकारी सौरभ कुमार, नांदेड जिल्हा औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष हर्षद शहा, आनंद बिडवई, निर्यातदार निलेश देशमुख तसेच निर्यातक्षम उद्योगांचे उद्योजक, नवउद्योजक व विविध शासकीय विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

नांदेड जिल्ह्यात जिल्हा निर्यात केंद्राची निर्मिती करणे व निर्यातीबाबत उद्योजकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश असल्याचे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे यांनी प्रास्ताविकात नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'लोकल टू ग्लोबल' या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी केंद्र शासनाच्या डाक विभागामार्फत उपलब्ध असलेल्या डाक घर निर्यात केंद्र, डाक पोर्टल नोंदणी तसेच सुलभ व आधुनिक निर्यात प्रक्रियेबाबत अधिकारी अक्षय कुलकर्णी यांनी पॉवर पॉईंट सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली.

उद्योग व व्यापार सुलभतेच्या दृष्टीने मैत्री कक्ष अंतर्गत उद्योगांच्या अडचणी एकाच छताखाली सोडविण्याची व्यवस्था असल्याचे अधिकारी धनश्री जाधव व मनोज डोमाणे यांनी ऑनलाईन मार्गदर्शनातून स्पष्ट केले. उद्योग सुरू करण्यासाठी कर्जविषयक अडचणी, शासकीय योजनांचा लाभ व उद्योजकांनी सकारात्मक मानसिकतेने पुढे येण्याची आवश्यकता बँक अधिकाऱ्यांनी अधोरेखित केली.

केळी उत्पादन घटकाच्या संशोधन व निर्यात अनुभवाबाबत माहिती देताना निर्यातदार निलेश देशमुख यांनी निर्यातीतील अडचणी, त्यावरील उपाय तसेच ग्राहकांना गुणवत्तापूर्ण माल पुरविण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यशाळेचे आभार प्रदर्शन व्यवस्थापक अनिल कदम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग निरीक्षक सतीशकुमार चव्हाण, अरविंद भांडे, सोमेश आठवले, एमसीईडी संस्थेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. या कार्यशाळेस सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटक, निर्यातदार, निर्यातक्षम व नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, शेतकरी सहकारी संस्था, प्रक्रिया उद्योग केंद्र, निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, संशोधक तसेच बँका व विविध शासकीय यंत्रणांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### जीतूसमोर संकटांचे नवे आव्हान; पारस अरोराने उलगडला भावनिक प्रवास

**छत्रपती संभाजीनगर** – एन्ड टीव्हीवरील 'घरवाली पेडवाली' मालिकेत पारस अरोरा साकारत असलेल्या जीतू या भूमिकेसमोर कथानकात नव्या संकटांची मालिका उभी राहत आहे. मंदिरातील विधी, चेतावण्या आणि अलौकिक घडामोडींमुळे कथा अधिक गडद होत असल्याचे त्याने सांगितले.

पारसच्या मते, तर्कशुद्ध विचार करणारा जीतू कुटुंबाभोवती घडणाऱ्या विचित्र घटनांमुळे भावनिक गोंधळात सापडतो; भीती, जबाबदारी आणि प्रेम यांच्या संघर्षातून विनोदी प्रसंग घडतात. मंदिरातील दृश्यांचे चित्रीकरण करताना गंभीरता आणि विनोद यांचा समतोल राखणे आव्हानात्मक ठरल्याचेही तो म्हणाला. सीरत कपूर व प्रियमवदा कांतसोबत काम करताना भूमिकेत पूर्णपणे रमण्याचा अनुभव मिळाल्याचे त्याने नमूद केले. मालिका सोमवार ते शुक्रवार रात्री १० वाजता एन्ड टीव्हीवर; भाग झी५ वर उपलब्ध आहेत.

### अभिनेत्री सपना ठाकूर रीटा पांडेच्या भूमिकेत

**छत्रपती संभाजीनगर** – एन्ड टीव्हीवरील 'घरवाली पेडवाली' या मालिकेत अभिनेत्री सपना ठाकूर या रीटा पांडेच्या भूमिकेत दिसणार आहेत. त्यांच्या आगमनामुळे कथानकात भावनिक परिपक्वता, कौटुंबिक नात्यांतील जिव्हाळा आणि नव्या घडामोडींची भर पडणार आहे. रीटा ही समजूतदार, आधुनिक विचारांची पण कुटुंबाला महत्त्व देणारी व्यक्तिरेखा आहे. कॉमेडी शैलीत काम करण्याची इच्छा या भूमिकेमुळे पूर्ण झाल्याचे सपना ठाकूर यांनी सांगितले. मालिका सोमवार ते शुक्रवार रात्री १० वाजता एन्ड टीव्हीवर प्रसारित होते; भाग झी५ वर पाहता येतात.

### 'जनरेशन लार्ज' च्या मूळ आवाजासह परत आले

**छत्रपती संभाजीनगर** – सीग्रामचा रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा बॉलीवूडच्या अजरामर सुरांना आणि हिप–हॉपच्या ऊर्जावान तालांना एकत्र आणणारा, संगीतप्रेमींमध्ये खास ओळख असलेला अनुभवाधारित संगीत महोत्सव पुन्हा एकदा आपल्या बहुप्रतिक्षित सीझन फोरसह परतला आहे. मागील सर्व सीझनना मिळालेल्या प्रचंड यशावर उभारलेला हा नवा सीजन यंदा अधिक भव्य आणि महत्त्वाकांक्षी ठरणार असून, भारतातील तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामवंत कलाकारांची दमदार फळी यात सहभागी होणार आहे. तरुणाईच्या उत्साहाने भरलेल्या व्हिझाग, कोलकाता, मुंबई आणि मोहाली या चार प्रमुख शहरांमध्ये होणारा हा मल्टी–सिटी टूर संगीतप्रेमींना एक अविस्मरणीय अनुभव देणार आहे. रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा आजच्या तरुण पिढीच्या विविध आवडी–निवडींना एकत्र आणणारा, आगळा–वेगळा अनुभव देणारा उपक्रम म्हणून ओळखला जातो. संगीत, फॅशन, खाद्यसंस्कृती आणि गेमिंग अशा तरुणाईच्या आवडत्या क्षेत्रांना जोडणाऱ्या उपसंस्कृतिक घटकांचा सुरेख संगम साधत, हा मंच प्रेक्षकांना वेगळ्या आणि प्रभावी अभिव्यक्तीचा अनुभव देतो.

### ५० वर्षे, एक राष्ट्र, असंख्य मॅगी 'एकत्रितपणाचे क्षण'

**छत्रपती संभाजीनगर** – नेस्ले इंडिया भारतातील मॅगीच्या ५० वर्षांचा उत्सव साजरा करताना एक स्मरणीय पोस्टल स्टँप लॉन्च करताना आनंदित आहे. हा स्टँप श्री मनीष तिवारी, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, नेस्ले इंडिया, आणि श्री चिराग पासवान, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री, भारत सरकार यांच्या हस्ते अनावरण करण्यात आला. हा स्टँप मॅगीच्या उत्क्रांतीला, नेहमीच नवकल्पनांसोबत पुढे राहण्याला आणि एका खूपच आवडत्या श्रेणीशी जोडलेल्या अनुभवांना सन्मान देतो – तसेच पिढ्यांमधून लोकांना एकत्र आणत राहतो, एकमेकांसोबत एकत्रित क्षण साजरे करत राहतो.

### प्रेसस्टोनिक इंजिनिअरिंगला मुंबई मेट्रोसाठी ११५ कोटींचा करार

**मुंबई** – प्रेसस्टोनिक इंजिनिअरिंग लिमिटेडला मुंबई मेट्रो प्रकल्पासाठी टिटागढ रेल सिस्टिम्स लिमिटेडकडून ११५.०९ कोटींचा महत्त्वपूर्ण करार मिळाला आहे. हा करार कंपनीच्या शहरी रेल पायाभूत सुविधांमधील वाढीच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.या करारांतर्गत २४० मेट्रो कोचेससाठी सॅलून इंटीरियर भागांचे डिझाइन, उत्पादन, पुरवठा, बसविणे, चाचणी व कमिशनिंग केले जाणार आहे. हे कोच मुंबई मेट्रो लाईन ५ आणि लाईन ६ साठी वापरण्यात येणार आहेत. ही माहिती सेबीच्या लिस्टिंग नियमांनुसार नॅशनल स्टॉक एक्सचेंजमध्ये सादर करण्यात आली आहे.

# एमजीएम स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये 'स्वाती' उपक्रमावर धोरणात्मक बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि. ०७ फेब्रुवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या वतीने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी पाऊल टाकत स्वाती (स्किल्स फॉर विमेन ॲडव्हान्समेंट अँड ट्रेनिंग इनिशिएटिव्ह) उपक्रमासंदर्भात उच्चस्तरीय धोरणात्मक बैठकीचे आयोजन एमजीएम विश्वस्त कार्यालय येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते.





यावेळी, ग्रीव्हज कॉटन लिमिटेडचे अध्यक्ष करण थापर, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.हरिरंग शिंदे, संचालिका डॉ.परमिंदर कौर, ग्रीव्हज कॉटनच्या शेफाली सुरी, अर्पित आस्थाना, प्राध्यापक व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

महिलांना उद्योग सुसंगत व्यावसायिक शिक्षण, रोजगारक्षम कौशल्ये तसेच उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षणातील दर्जा, कॉर्पोरेट नेतृत्व आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा समन्वय साधण्यावर चर्चेदरम्यान विशेष भर देण्यात आला.

या संवादात एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून अभ्यासक्रम निर्मिती, अनुभवाधारित शिक्षण, मार्गदर्शन आणि रोजगाराभिमुख संधी निर्माण करण्याच्या सहकार्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः दुर्लक्षित व वंचित घटकांतील महिलांना भविष्यासाठी सज्ज कौशल्ये, आत्मविश्र्वास आणि आर्थिक स्वावलंबन प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने 'स्वाती' उपक्रमाचे धोरणात्मक महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

या चर्चेच्या माध्यमातून सर्वसमावेशक विकास, महिलाकेंद्रित कौशल्यविकास आणि उद्योगसंलग्न शिक्षणाबाबतची ठाम बांधिलकी अधिक दृढ झाली असून ग्रीव्हज कॉटन लिमिटेडच्या अर्थपूर्ण सीएसआर उपक्रमांद्वारे समाजात सकारात्मक बदल घडविण्याची संकल्पना अधिक दृढ झाली.

## जितो लेडीज विंग तर्फे सांस्कृतिक कार्यकम हळदी कुंकवाचा कार्यकम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि. ०७ फेब्रुवारी :** जितो लेडीज विंग छत्रपती संभाजीनगर च्या वतीने मकर संक्रातीचे औचित्य साधुन जितो लेडीज विंग च्या अध्यक्ष प्रिया मुथा, सचिव सोनल जैन, उपाध्यक्ष प्रिती बाकलीवाल, कोषाध्यक्ष प्रियंका संघवी यांच्या मार्गदर्शनाखाली साई प्रसाद हॉल येथे संक्राती एलिट कार्यकमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यकमात उत्साहा बरोबर सर्जन शिलतेचा सुंदर संगम पहायला मिळाला. टेक अवे लर्निंग बोहो विथ थ्रेडस मॅक्रैमे या सत्राला सदस्यांकडुन विशेष प्रतिसाद मिळाला. या कार्यकमासाठी प्रसिध्द समाजसेविका व सरस्वती विराजीत रेखा राठी व रोबोटिक्स प्रीस्कुलच्या संचालिका कपिलाजी करवा, परिक्षक म्हणुन उपस्थित होत्या. या कार्यकमात उखाणा स्पर्धा, उत्कुष्ट महाराष्ट्रीयन वेशभुषा, गट खेळ विथ मनोरंजन कार्यकमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १०५ महिलांचा सहभाग होता. जितो लेडीज विंग एलिट मकरस क्राती कार्यकम उत्साहात संपन्न झाला. जितो लेडीज विंग, सी.एस.एल. सतत प्रगती करत असुन येत्या काळात अनेक प्रेरणादायी व स्मरणीय कार्यकम आयोजीत केले जातील असेही यावेळी सांगण्यात आले. यावेळी जितो अपेक्स युथ चे पारस ओस्तवाल, अनिलकुमार संचेती, आशिष संकलेचा, नमित मुथियान यांचीही यावेळी उपस्थिती होती. यावेळेस रोमचेअरपर्सन डिपल पगारीया व कनवेनर्स सपना मुथीयान सुरभी सचेती उपस्थित होते व जितो लेडीज विंग व सी.एस. एन यांच्या कला व सांस्कृतिक कार्यकाची प्रशंसा केली. पुढे आत्मनिभर कार्यशाळाआयोजित करु असे प्रिया मुथा यानी घोषणा केली

## पैठणला सरासरी ७५ टक्के मतदान; सोमवारी मतमोजणी

**तभा वृत्तसेवा**
**पैठण, दि. ०७ फेब्रुवारी :** पैठणला जिल्हा परिषदेच्या ९ तर पंचायत समितीच्या १८ जागेसाठी शनिवारी दिनांक ७ फेब्रुवारी रोजी मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली असून एकूण ३०६ मतदान केंद्रावर सरासरी ७५ टक्के मतदान झाले आहे.१०५ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीम पेटीत बंद झाल्याने त्याचा फैसला ९ फेब्रुवारी सोमवार रोजी संतपीठ येथे मतमोजणीच्या दिवशी होणार आहे.आमदार विलास बाप्पू भूमरे यांनी पाचोड मतदान केंद्रावर आपल्या कुटुंबासह मतदानाचा हक्क बजावला.



पैठण तालुक्यातील चितेगांव, बीडकीन, आडुळ, पाचोड, दावरवाडी, ढोरकिन, पिंपळवाडी पिराची, विहामांडवा, नवगांव गट आणि गणासाठी एकूण २ लक्ष ४७ हजार ८४५ मतदारा पैकी ईतक्या सरासरी ७५ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. काही मतदान केंद्रावर संध्याकाळी मतदारांच्या रांगा दिसल्या. ९ फेब्रुवारी सोमवार रोजी निवडणूक निर्णन अधिकारी फुलारी, निवडणूक अधिकारी ज्योती पवार,सहाय्यक यांच्या प्रमुख उपस्थित संतपीठ येथे सकाळी ८ वाजेपासून १८ टेबल वर मतमोजणी होणार असून मतमोजणीच्या २० फेऱ्या होणार आहे. यासाठी २२५ कर्मचारी तैनात करण्यात आले आहे.दुपारी ३ वाजेपर्यंत तालुक्यातील सर्व निकाल अपेक्षित आहे.

९ गटासाठी ३५ तर १८ गणासाठी ७० असे एकूण १०५ उमेदवारांनी आपले नशीब आजमावले यात शिवसेना,भाजपा पुरुस्कृत उमेदवार, राष्ट्रवादी कॉंग्रेस, उ.बा.ठा शिवसेना, कॉंग्रेस पक्ष्यात काटेची टक्कर पाहवयास मिळाली तर वंचित आणि एम.आय.एम पक्षाने काही ठिकाणी आपले उमेदवार दिल्याने त्याठिकाणी रंगतदार लढत पाहावयास मिळाली. तालुक्यातील बीडकीन, ढोरकिन,विहामांडवा, दावरवाडी,नवगांवला हायहोल्टेज लढत झाल्याने या जागेंच्या निकालावर जनतेचे लक्ष लागले आहे. पाचोड मतदान केंद्रात आमदार विलास बाप्पू भूमरे यांनी आपल्या लहान मुलाला सोबत घेऊन मतदान केल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

# आग्नेय किड्स इंग्लिश स्कूल चे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि. ०७ फेब्रुवारी :** आग्नेय किड्स इंग्लिश स्कूल चे वार्षिक स्नेहसंमेलन आणि विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन म्हाडा कॉलनी येथे करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. डी.बी. खिल्लारे, डॉ. इंगळे, अरविंद अवसरमोल,किसन सरकटे, प्रा. मिलिंद अवसरमोल, संचालिका भारती अवसरमोल हे उपस्थित होते. वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या प्रा. सोनाली अवसरमोल यांनी केले, तर प्राध्यापक मिलिंद यांनी प्रास्ताविक मांडले, यातून स्नेहसंमेलन कार्यक्रमाची रूपरेषा मांडली व शाळेच्या शैक्षणिक वर्षभर राबवलेल्या विविध उपक्रमाचा आढावा सादर केला. त्याचप्रमाणे ॲड. डी.बी.खिल्लारे विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर कौशल्यपूर्ण, कलागुण विकसीतपूर्ण शिक्षण मिळणे महत्वाचे आहे, शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, हा उद्देश समोर ठेवून आपण शिक्षण दिले तर नक्कीच शिक्षणाचे महत्त्व लक्षात येईल असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्ती गाणे विविध कलागुण सादर केले, त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. शेवटी संचालिका भारती अवसरमोल यांनी मान्यवरांचे आभार मानले. त्यामुळे मोठ्या संख्येने नागरिक आणि पालक उपस्थित होते.

## टाटा सॉल्टची मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि. ०७ फेब्रुवारी ::** भारतातील आयोडाइज्ड मीठ विभागात १९८३ पासून अग्रणी आणि बाजारातील आघाडीचा ब्रँड असलेल्या टाटा सॉल्टतर्फे 'हर नारंगी पॅक टाटा नमक नही होता' हा ठाम संदेश देत, बनावट मीठ पॅकविरोधात लढ्याचे नेतृत्व करण्यात येत आहे. विशेषतः महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असलेल्या असंघटित मीठ बाजारपेठेत आणि बनावट मीठ पॅकच्या वाढत्या प्रमाणाच्या पार्श्र्वभूमीवर शुद्धता व विश्र्वासाचे नवे मापदंड प्रस्थापित करत, ही जाहीर घोषणा टाटा सॉल्टच्या उत्कृष्ट दर्जाचे मीठ पुरवण्याच्या ठाम वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

## जैनम महिला मंच चा हळदी कुंकवाचा कार्यकम उत्साहात पार पडला

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि. ०७ फेब्रुवारी :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जैनमच्या हळदी कुंकु जल्लोषात उत्साहात पार पडले. ५०० सदस्यांची उपस्थिती होती. क्वीन ची स्पर्धा घेण्यात आली. त्याच क्वीन चा सन्मान सौ.सपना चोपडा यांनी पटकावला. तिने तीन राउड पार केला. २. स्नेहलता ठोलिया, ३. वंदना कांकरिया, ४. भावना चोरडीया यांनी मान मिळविला. २७ स्पर्धकांनी यात भाग घेतला होता. विविध गेम घेण्यात आले. महिलांनी डान्स, गाणी, जोक आदी मध्ये रमुन हळदी कुकु कार्यकमाचा आनंद घेतला तसेच भोजनाचा ही आनंद घेतला.


## पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित शिरसोली,जळगांव

नोंदणी क्र.जे.जी.ए./जे.जी.ए./आर.एस.आर./सी.आर./२२१/२१०/२००० दि.१८/१०/२०००
नोंदणीकृत पत्ता : अरुणाई संकुल, कोर्टा समोर, अमळनेर ता.अमळनेर जि. जळगांव
संपर्क: पत्ता : ७१, युनिटी चेंबर्स, गणेश कॉलनी रोड, जळगांव फोन : ०२५७–२२५५७६३

**स्थावर मालमत्ता जाहीर लिलावाने विक्रीचा जाहीरनामा**

दिनांक : ०७/०२/२०२६

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम १०७ (११)**

तमाम संबंधीत व्यक्तींना कळिवण्यांत येते की, पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेच्या खालील कर्जदाराकडील कर्ज थकबाकी वसुलीसाठी सदरील थकबाकीदार / जामिनदार / मान्यतादार यांच्या स्थावर मिळकती वेळोवेळी काढण्यात आलेल्या स्थावर जप्ती आदेशान्वये यापुर्वीच जप्ती करण्यात आल्या असून त्यांची जाहीर लिलावाने विक्री करणे क्रमप्राप्त आहे व सदरहू थकबाकीदार / जामिनदार / मान्यतादार व्यांना सदरील मिळकती मधील मालकी हक्क / हितसंबंध विक्री अधिकारी हे अधिकार वापरुन खाली नमुद केल्याप्रमाणे. जाहीर लिलावाने विक्री करतील व सदरील विक्री ही संबंधीत मिळकतीचे मालक, हितसंबंधी वारसदार या सर्वांवर बंधनकारक राहिल. सदर स्थावर मिळकत जशी आहे, जी आहे, जेथे आहे त्या स्वरूपात विक्री करावयाची आहे. तरी कोणास लिलाव बोलावयाचा असल्यास त्यांनी सदरील लिलावाच्या वेळी व ठिकाणी हजर राहून लिलावात भाग घ्यावा. **२) लिलावाची वेळ : स.११ ते दु.४ वाजेपर्यंत लिलावाचे कामकाज सुरू राहिल.**

| अ. नं. | थकबाकीदार/ मिळकतधारकाचे नांव, गांव | स्थावर मिळकतीचा तपशील | | | | वसुली दाखला दिनांक व त्या दिनांकास थकबाकीची रक्कम+ व्याज +वसुली खर्च | वाजवी किंमत (अपसेट प्राईज) | लिलावाचे स्थळ | लिलावाचा दिवस आणि तारीख | लिलाव बोली न आल्यास अगर तहकुब झाल्यास पुन:लिलाव दि. ठिकाण व वेळेत बदल नाही. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मौजे | गट नं./ भुमापन क्र. | क्षेत्र | आकार | | | | | |
| १ | रामगोपाल बन्सीलाल खंडेलवाल गोदावरी, प्लॉट नं. १०, एन–५, सिडको, छ.संभाजीनगर जामिनदार १) नितीन अशोकराव पेडगांवकर रा. मोगरा जी गुरुसहानी नगर, सिडको,छ.संभाजीनगर २) राजु बाबुराव डोळे मालमत्ता धारक, लक्ष्मीअपार्टमेंट प्लॉट नं.४,टेलीफोन ऑफिस जवळ,छ.संभाजीनगर | मौजे देवळाई ता. जि.छत्रपती संभाजीनगर | गट नं. ७८ मधील खाते क्र. ५०३४ | ०० हे. २९.८९ आर | ०.३१ | वसुली दा.केस क्र.२३/२००८ रु.२८,१२.२४९/– दि.१२/०५/२००८ पासुन द.शा.द.शे.१८% होणारे व्याज+वसुली खर्च दि.२६/१२/२०२५ अखेर थकबाकी रु. ५,९०,३२,५५४/– +पुढील व्याज. | रु.३,८८,५७,००० जि.उ.नि.सह संस्था छ.संभाजीनगर यांचे आदेश दि.०८/०१/ २०२६ | तहसिल कार्यालयाचे आवारात, छ.संभाजीनगर | दि.१४/०३/२०२६ रोज शनिवार | दि.२०/०३/२०२६ रोज शुक्रवार |
| २ | रामगोपाल बन्सीलाल खंडेलवाल गोदावरी, प्लॉट नं. १०, एन–५, सिडको, छ.संभाजीनगर जामिनदार १) नितीन अशोकराव पेडगांवकर रा. मोगरा जी गुरुसहानी नगर, सिडको,छ.संभाजीनगर २) राजु बाबुराव डोळे मालमत्ता धारक, लक्ष्मीअपार्टमेंट प्लॉट नं.४,टेलीफोन ऑफिस जवळ,छ.संभाजीनगर | मौजे घारदोन ता.जि.छत्रपती संभाजीनगर | गट नं. १६३ मधील शेत जमिन | ०० हे.८१ आर | ०.५९ | वसुली दा.केस क्र.२३/२००८ रु.२८,१२.२४९/– दि.१२/०५/२००८ पासुन द.शा.द.शे.१८% होणारे व्याज+वसुली खर्च दि.२६/१२/२०२५ अखेर थकबाकी रु. ५,९०,३२,५५४/– +पुढील व्याज. | रु.२४,३०,००० जि.उ.नि.सह संस्था छ.संभाजीनगर यांचे आदेश दि.०८/०१/ २०२६ | तहसिल कार्यालयाचे आवारात, छ.संभाजीनगर | दि.१६/०३/२०२६ रोज सोमवार | दि.२१/०३/२०२६ रोज शनिवार |

टिप : १) लिलावाच्या अटी व शर्ती लिलाव सुरू होण्यापुर्वी लिलावाच्या ठिकाणी वाचुन दाखविल्या जातील. २) सरकारी किंमतीच्या खाली बोली स्विकारली जाणार नाही. ३) या लिलावात भाग घेणेसाठी बिनव्याजी अनामत रक्कम रू.१००००/– जमा करावी लागेल. ४) प्रत्येक लिलाव बोली रु.५०००/– ने वाढवुन स्विकारली जाईल. ५) या नोटीसीची प्रत ग्रामपंचायत / म. तलाठी/ म. तहसिलदार / सहाय्यक निबंधक /जिल्हा उपनिबंधक / म. कलेक्टर सो. यांचे कार्यालयास योग्य तया प्रसिध्दीसाठी पाठविल्या आहेत. ६) लिलाव बोली अंतिम झाले नंतर साधारण अर्धा किंवा तासभरात १५% रक्कम अनामत रोख जमा करावी लागेल व बाकी ८५% रक्कम ३० दिवसांत भरणे अनिवार्य राहिल. स्टॅम्प व इतर खर्च पण जमा करावा लागेल. ७) लिलाव मंजुर करणे अथवा कोणतेही कारण न देता तहकुब करणे, रद्द करणे इ. अधिकार संस्थेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांना राहतील. ८) जाहीर लिलाव झाल्यानंतर बिनव्याज़ी अनामत रू.५०००/– परत होईल. ९) कोणत्याही जमा अनामत रक्कमेवर व्याज दिले जाणार, नाही. १०) सदरील मिळकत असलेल्या बोजा सहीत अगर बोझा विरहीत या पैकी कोणत्याही पध्दतीने विक्री करून लिलावाची प्रक्रिया पुर्ण केली जाईल.

ठिकाण : जळगांव
दिनांक : ०७/०२/२०२६

सही – महेश सुधाकरराव कुलकर्णी
विशेष वसुली व विक्री अधिकारी
पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित शिरसोली,जळगांव महा.सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये


# जैनम महिला मंच चा हळदी कुंकवाचा कार्यकम उत्साहात पार पडला

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि. ०७ फेब्रुवारी :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जैनमच्या हळदी कुंकु जल्लोषात उत्साहात पार पडले. ५०० सदस्यांची उपस्थिती होती. क्वीन ची स्पर्धा घेण्यात आली. त्याच क्वीन चा सन्मान सौ.सपना चोपडा यांनी पटकावला. तिने तीन राउड पार केला. २. स्नेहलता ठोलिया, ३. वंदना कांकरिया, ४. भावना चोरडीया यांनी मान मिळविला. २७ स्पर्धकांनी यात भाग घेतला होता. विविध गेम घेण्यात आले. महिलांनी डान्स, गाणी, जोक आदी मध्ये रमुन हळदी कुकु कार्यकमाचा आनंद घेतला तसेच भोजनाचा ही आनंद घेतला.



हा कार्यकम यशस्वी करण्यासाठी प्रायोजक इंदुमती निर्मलचंद पगारीया व आशा कासलीवाल कन्नडवाले यांनी स्विकारले. दिया काला ,सविता लोढा यांनी सुत्रसंचालन केले. संगीता संचेती यांनी वर्षभर कार्यकमाचा आढवा दिला. यावेळी परीक्षक म्हणुन रिया फिरोदीया, रविना सुगंधी हया होत्या.

कार्यकम यशस्वी करण्यासाठी मिनल बागरेचा, प्रिया बागरेचा, शितल पारख, अक्षता साकला, रेश्मा कोठारी, राखी कोठारी, सोनल कासलीवाल, विशाखा कासलीवाल, सोनल कोठारी, प्रिती पारख आदींनी परिश्रम घेतले. तसेच भारती बागरेचा, ललीता साकला यांच्यासह सर्व कार्यकारणी सदस्यांची उपस्थिती होती. कार्यकमात लासुर, कन्नड, वाळुज, पंढरपुर कचनेर आदी ठिकाणाहुन सदस्यांची उपस्थिती होती.